# माणूस

१६ डिसेंबर '७२
पन्नास पैसे

## एक अधुरी कहानी



शनिवार
१६ डिसेंबर १९७२

पन्नास पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : अठ्ठावीस

**सप्रेम नमस्कार...**

११ नोव्हेंबर, ७२

□ पुण्यात असूनही एवढ्या शांतपणे 'माणूस'चे अंक कधी वाचू शकले नव्हते, ते येथे आल्यावर वाचायचा योग आला. १५ ऑगस्टपासून सुरू केलेली ' मी नेताजींना बघितलंय ' ही लेखमाला अद्वितीय आहे. प्रत्येक लेख खाली ठेववत नाही. सहज सुंदर भाषेने वाचकांच्या मनाची पकड घेतली जाते. परंतु आझाद हिंद सैनिकांचे देशप्रेम वाचून आपण किती क्षुद्र आहोत याची जाणीव तीव्रपणे होते. खरोखर या लेखांचे उतारे शालेय पुस्तकात घालणे फार अवश्य आहे.

**मालतीबाई जोशी,** (देवळाली कँप)

१० नोव्हेंबर, ७२

□ माणूस दिवाळी अंक वाचला. खूप आवडलाही. अंक विकत घेतल्याचं समाधान मिळालं. श्री. भाऊ पाध्ये यांनी पेश केलेली ' गुरुदत्त-चरित्र ' कथा गुरुदत्तांचं महात्म्य बरोबर दाखवून देते. या श्रेष्ठ कलावंताची उलघाल भाऊ पाध्यांनी अचूक जाणलीय हे प्रकर्षाने जाणवते. श्री. भाऊ पाध्ये यांना आमचा पण सलाम सांगा.

–बाकी अंतरंग लक्षणीय आहेच. पण कथांबाबत मात्र थोडीफार निराशा झाली. कविता भेटल्याचा आनंद वाटला. बहिष्कार उठवला की काय ?

' कुमार गंधर्वांचं शांत तृप्त जग '

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

त्यांच्या गाण्यासारखं भरदार.

मुखपृष्ठ टॉप. कदाचित ते फ्रेमही केले जाईल. श्री. सुभाष अवचट रंगाबरोबर काव्यही ओतण्यात यशस्वी झालेयत्. मनःपूर्वक अभिनंदन.

संपादकीय बरंच काही सांगून जातं.

**मोहन मुळे,**
नागठाणे (सातारा)

---

# एक खुलासा

## लीला वि. प्रधान

दिनांक १६ सप्टेंबर १९७२ च्या 'माणूस'च्या अंकात श्री. स्नेहप्रभा प्रधान हिच्या आत्मचरित्राचा सुरुवातीचा काही भाग प्रसिद्ध झाला आहे. आज ४० वर्षे किंवा अधिक काळपर्यंत तिचा व माझा संबंध नाही व पुढेही यावा अशी इच्छाही नाही. पण तिने ह्या आत्मचरित्रात ज्या धादांत खोटया गोष्टी लिहिल्या आहेत त्यांचा माझ्या पू. वडिलाशी संबंध येत असल्यामुळे त्यांना न्याय देणे हे माझे कर्तव्य ठरते.

स्नेहप्रभा प्रधानची माझ्या वडिलांच्या पुण्याईवर जगण्याची केविलवाणी धडपड, आपल्या मातुश्रीचे पारडे जड करण्याची तडफड व त्याच बरोबर आम्हावर उडविलेले शितोडे या सगळयांनी अजाण माणसे फसतील पण जे आम्हाला, तिच्या मातुश्रीला व तिला ओळखतात ते कसे फसणार. ?

तिने आमचे वडिल 'आपल्या सावत्र बहिणीच्या पूर्ण कवजात गेले होते' व 'या बहिणीला तिच्या आईबद्दल इर्षा वाटत असावी असे निर्लज्ज विधान केले आहे. आणि याच परिच्छेदात तिने भयंकर घोटाळे करून ठेविले आहेत. (जाणून बुजून ?) मुलीच्या कब्ज्यात जाऊन पत्नीला त्रास देण्याइतके वडिल उल्लू होते असे तिला सुचवायचे आहे का ? आणि ही सावत्र बहिण कोणती ? ती. वडिलांच्या दुर्दैवाने त्यांच्या पहिल्या पत्नीशी त्यांचा संसार १८९५ ते २ जून १८९६ पर्यंतच झाला. हिच्या मृत्यूनंतर त्यांनी डिसेंबर १८९७ साली तिच्याच लहान बहिणीशी द्वितीय विवाह केला. या विवाहापासून जी अपत्ये झाली त्यापैकी दोनच जगली. माझी मोठी बहिण इंदिरा-जन्म १८९९—व भाऊ मनोहर—जन्म १९०६. तो सव्वा वर्षाचा होतो तोच ही पत्नीपण वारली. या वेळेपर्यंत ती. वडिलांचे विचार पुरोगामी होत चालले व यानंतर त्यांनी आपले मत कृतीत उतरावयाचे ठरविले व उमरावतीचे प्रसिद्ध वकील कै. रा. रामकृष्ण रावजी जयवंत (श्री. सौ. कुसुमावती देशपांडे यांचे वडील) यांची गतमर्तुका बहिण—महर्षी कर्वे यांच्या सुरुवातीच्या विद्यार्थिनींपैकी—गोदुताई हिच्याशी १९०८ साली पुर्नविवाह केला. या संबंधापासून जी

[ पृष्ठ ६१ वर ]

# मृणाल सेन यांचा एक अधूरी कहानी

ज्ञानेश्वर नाडकर्णी

काही वर्षांपूर्वी 'भुवन शोम' या हिंदी चित्रपटामुळे मृणाल सेन हे तरुण बंगाली दिग्दर्शक रसिकांच्या नजरेसमोर आले. सत्यजित राय या एकाच बंगाली दिग्दर्शकाने तोवर भारतीय चित्रपटांचे नाव जगभर केलेले होते. ऋत्विक घटक हे त्यांच्याच तोडीचे दुसरे एक लक्षणीय बंगाली दिग्दर्शक (काही काळ ते पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटमध्ये अध्यापक होते), परंतु मध्यंतरीची बरीच वर्षे ते व्यसनवार्जामुळे निष्क्रीय राहिले. तपन सिंह हे तसे मिळमिळीत; परंतु येनकेनप्रकारेण त्यांनी आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवांपर्यंत धडक मारली. आपल्या सुरुवातीच्या साऱ्या चित्रपटांत मृणालदांनी सच्च्या कलात्मकतेची ग्वाही दिली, परंतु 'भुवन शोम'पर्यंत त्यांचे नाव पाश्चात्य व भारतीय रसिकांना बव्हंशी अपरिचितच राहिलेले होते.

श्री. बी. के. करंजिया ('फिल्मफेअर'चे संपादक) हे फिल्म फायनॅन्स कॉर्पोरेशन (FFC) या सरकारी चित्रपट साहाय्य मंडळाचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी मंडळाच्या धोरणात आरपार बदल केला. मोठ्या धीटपणे, कमी खर्चात निर्माण होणाऱ्या परंतु निखळ कलात्मक मूल्ये व्यक्त करणाऱ्या चित्रपटांना कर्ज देण्याचा त्यांनी धडाका लावला. 'बनफूल' या बंगाली लेखकाच्या लघुकादंबरीवर आधारलेला 'भुवन शोम' हा या प्रकारचा पहिला चित्रपट होय. त्याने येथे व परदेशात (विशेषत: व्हेनीस चित्रपटमहोत्सवात) पारितोषिके मिळवलीच परंतु गल्लाभरू हिंदी चित्रपटांना मद्दडपणे उदार आश्रय देणारा सर्वसाधारण प्रेक्षकवर्गही त्याने मुंबई-कलकत्त्यात मोठ्या प्रमाणावर, प्रथमच, कलात्मक आणि आशयघन परंतु बडे सितारे नटवर्गात नसलेल्या

अशा चित्रपटांकडे खेचून आणला.

श्री. करंजिया यांच्या कारकीर्दीत FFC ने आता सबंध देशात कलात्मक चित्रपट दाखविण्यासाठी खास चित्रगृहे उपलब्ध करून देण्याची योजना आस्ते आस्ते कार्यवाहीत आणावयास सुरुवात केलेली आहे. भारतातील अशा पहिल्या FFC प्रणित 'कलात्मक चित्रगृहा'चे उद्घाटन मुंबईत पंडित नेहरूंच्या वाढदिवशी (ता. १४ नोव्हेंबर, १९७२ रोजी) 'पिंजरा'फेम शांतारामबापूंच्या हस्ते झाले. येथील सचिवालयाजवळील नव्या आकाशवाणी भवनात ६२५ आसनांचे जे अद्ययावत्, सुसज्ज आणि वातानुकुलित सभागृह तेथेच 'एक अधूरी कहानी' हा मृणालदांचा नवा हिंदी चित्रपट ता. १४ नोव्हेंबरपासून चालू आहे आणि आश्चर्य म्हणजे, बऱ्यापैकी गर्दी खेचीत आहे!

अरुण कौल यांनी निर्माण केलेल्या या कृष्णधवल चित्रपटाची मूळ बंगाली कथा 'गोत्रान्तर' ही सुबोध घोष यांची आहे. कथानकाचा काळ आहे पहिल्या महायुद्धानंतर सुमारे दहा वर्षांनंतरचा. संजय दत्त नावाचा एक सुशिक्षित परंतु बेकार बंगाली तरुण बिहारमधील एका साखर कारखान्यात कॅशरची नोकरी मिळाल्यामुळे कलकत्त्याहून कारखान्याच्या गावी स्थायिक व्हावयास येतो. 'भुवन शोम'च्या दुसऱ्या रिळात जशी मृणालदांनी रेल्वेत मोठ्या हुद्द्यावर असलेल्या भुवन शोम या अधिकाऱ्याची पूर्वपीठिका प्रेक्षकांना सांगितलेली आहे तशीच 'कहानी'च्या पहिल्या रिळात फ्लॅशबॅकद्वारे ते या तरुणाची त्या घटकेपर्यंतची कहाणी आपल्याला ऐकवितात. मात्र 'भुवन शोम'च्या दुसऱ्या रिळात त्यांनी आजकाल फॅशनेबल झालेल्या, छायाचित्रणाच्या व संकलनाच्या 'न्यू वेव्ह' तंत्राचा फारच धसमुसळेपणाने वापर केलेला होता. (पुढे आपल्या 'इंटरव्ह्यू' या बंगाली चित्रपटात तर त्यांनी या धसमुसळेपणाचा इतका अतिरेक केला की मुळातच उथळ असलेला हा चित्रपट सत्यजित राय यांच्या त्याच धर्तीच्या विषयावरील 'प्रतिद्वंदी'च्या मानाने कलादृष्टया कितीतरी उणा वाटला!) 'कहानी'मध्ये मात्र त्यांनी जवळजवळ प्रथमच 'न्यू वेव्ह' तंत्र अत्यंत जाणकारीने आणि साक्षेपाने राबविलेले आहे. 'भुवन शोम' प्रसिद्ध तरुण छायाचित्रलेखक के. के. महाजन यांच्या अत्यंत कौशल्यपूर्ण छायाचित्रणाची जोड मृणालदांच्या दिग्दर्शनाला मिळाल्यामुळे तंत्रदृष्टया 'कहानी'मध्ये फारच थोड्या त्रुटी राहिलेल्या आहेत.

प्रस्तुत तरूण कॅशरची भूमिका विवेक चतर्जी हा नवोदित नट चेहऱ्यावर एकच गंभीर भाव ठेवून परंतु अभिनयाचा उगाच आटापिटा न करता वठवितो. त्याच्या नजरेत त्याच्या भूमिकेला शोभण्यासारखी एक प्रकारची उत्कटता आणि अंतर्मुखता आहे. (कथा त्याच्याच आवाजात ऐकू येते.) 'प्रतिद्वंद्वी'मधील धृतिमान् चतर्जी आणि 'इंटरव्ह्यू'मधील रणजित मलिक यांच्याशी त्याच्या व्यक्तिमत्त्वाची

तुलना करण्यासारखी आहे. कारखान्याच्या गावी संजय आपल्या स्वतःच्या खोलीत स्थायिक होतो. कारखान्याचा मालक रतनलाल हा त्याच्याशी फार प्रेमळपणाने वागून त्याच्यावर छाप टाकतो. वस्तुतः रतनलाल हा भांडवलशाहीचा एक अस्सल प्रतिनिधी असतो आणि आपल्या कारखान्यातील कामगार व कारखान्याला ऊस पुरविणारे शेतकरी यांच्या हिताची आपल्याला पालकाप्रमाणे काळजी घेतली पाहिजे असे सांगत असतो. गांधीयुगातील भांडवलदारात शोभून दिसणारा हा 'कनवाळू' रतनलाल आपल्या प्रशस्त बंगल्याबाहेरील हिरवळीवर मुंग्यांना साखर खाऊ घालताना दिसतो. भुवन शोमची भूमिका अविस्मरणीय पद्धतीने वठविणारे आणि 'शेक्सपियरवाला', 'द गुरू' आणि 'बॉम्बे टॉकी' या मर्चंट-आयव्हरी यांच्या इंडो-अमेरिकन चित्रपटात लक्षणीय भूमिका करणारे श्रेष्ठ, जहाल (डावे कम्युनिस्ट) बंगाली अभिनेते व नाटककार उत्पल दत्त यांनी हा मारवाडी रतनलाल एका व्यंग्यचित्राच्या पातळीवर, 'भुवन शोम'-मधील आपला सूर कुशलतेने बदलून परंतु मूलतः नाटकीपणे, रंगविलेला आहे. डोळ्यांच्या खोबणीतून बाहेर टपकावयास आलेल्या त्यांच्या बुबुळात मूर्खपणा आणि लुच्चेपणा यांचे एक स्वभावविशिष्ट मिश्रण दिसते. या मूर्खपणाच्यापाठी त्याचा ढोंगीपणा आहे (अत्र्यांच्या 'धर्मवीरा'त दिसतो त्या प्रकारचा); आणि त्याचा पडद्यावर आविश्कार करताना आजच्या बंगाली रंगभूमीवरील हा मोठा कलावंत दिग्दर्शकाला अभिप्रेत असलेला उपहासच व्यक्त करीत असतो. चित्रपटाच्या उत्तरार्धात त्याच्या स्वभावाची कुटिल बाजू आपल्यापुढे ठेवली जाते आणि त्याच्या पालकसदृश चांगुलपणाचे पितळ उघडे पडते.

संजयची देखभाल करणारा वृद्ध नोकर दुखिया हा त्याची फार प्रेमाने काळजी घेतो. त्याला बिहारी स्वयपाक करून घालतो, दारू अगर स्त्री यांच्या मोहात त्याने सापडू नये म्हणून सातत्याने त्याला उपदेश करतो आणि अत्यंत निष्ठेने त्याची सेवा करतो. ही भूमिका ज्ञानेश मुकर्जींनी अस्सलपणे वठविलेली आहे. शेतकरी बैलगाड्यांतून ऊस घेऊन येतात तो कारखान्याच्या दाराशी तोलण्याचे काम नेमियार नावाचा कारकून करीत असतो. ओढगस्तीच्या परिस्थितीत कसाबसा चरितार्थ चालविणाऱ्या आणि दररोज दारूत आपले दुःख बुडविणाऱ्या नेमियारची आणि संजयची चांगलीच दोस्ती होते. ही अत्यंत आगळी अशी स्वभावरेखा 'भुवन शोम'मध्ये सोरठी खेडुताचे काम करणाऱ्या शेखर चतर्जींने इतकी विनासायास वठविलेली आहे की अभिनय करणारा एखादा नट आपण पडद्यावर पाहात नसून बिहारच्या एका गावात सुमारे साडेतीन तपांपूर्वी खरोखरी अस्तित्वात असलेला एक भाबडा, निष्ठावंत कनिष्ठ मध्यमवर्गीय कॅमेऱ्यापुढे वावरतो आहे असा आपल्याला

भास होतो. (सत्यजित राय यांच्या 'पथेर पांचाली 'मधील विकलगात्र वृद्धेची भूमिका करणाऱ्या स्व. चुनिबालादेवीचेही असेच होते.)

नेमियारची अविवाहित बहीण रुक्मिणी ही एक अत्यंत सुंदर, प्रेमळ आणि निरागस अशी तरुणी असते. तिच्याबद्दल गावकरी सारखे काहींना काहीतरी वावगे कुजबुजत असतात. आरती भट्टाचार्य या नवोदित नटीने ही भूमिका मनात कायमची ठसावी अशा प्रकारे पडद्यावर साकार केलेली आहे. मात्र एक खेडवळ तरुणी म्हणून रुक्मिणी वाजवीपेक्षा जास्त सुंदर वाटते आणि, वास्तवतेचे कठोर निकष लावले तर, या पात्राचा अस्सलपणा मनाला पटत नाही. दिल घायाळ करणारे बोलके, टपोरे डोळे, निमुळती, तरतरीत नासिका आणि अत्यंत विलोभनीय दंतपंक्ती आरतीला लाभलेले आहेत. शिवाय टंच, भरदार अंगांगे ! सत्यजित राय यांच्यासारखा वास्तववादी दिग्दर्शकसुद्धा शर्मिला टागोर आणि माधवी मुकर्जी (झालेच तर वहिदा रहिमान) यांच्यासारख्या भावोत्कट डोळ्यांच्या, सौंदर्यसंपन्न नटींना सातत्याने नायिकांच्या भूमिका देऊन सांकेतिक सौंदर्यवादाला बळी पडतो आणि वास्तववादाशी फितुरी पत्करतो ! आरतीच्या बाबतीत मृणालदांचे असेच झालेले आहे. मात्र दोन वर्षे मुंबापुरीच्या बाजारी चित्रपटसृष्टीत काम शोधीत राहिलेल्या या लावण्यवती नटीला प्रथमच पडद्यावर आणण्याचे श्रेय आपण त्यांना दिलेच पाहिजे. रुक्मिणी आणि संजय यांच्यातील प्रथमपरिचयाचे रूपान्तर अटळपणे प्रेमसंबंधात व विवाहबाह्य शरीरसमागमात होते. (ही दृश्ये मृणालदांनी अत्यंत संयमाने चित्रित करून 'सेक्स'ला चटावलेल्या आंबटशोकी, 'प्रागतिक' प्रेक्षकाची निराशा केलेली आहे !) एव्हाना संजयबरोबरच रुक्मिणीच्या सौंदर्याने आणि लाघवाने चिकित्सक प्रेक्षकालाही गारेगार करून टाकलेले असते !

पूर्वार्धात या चित्रपटात संजय, रतनलाल, नेमियार आणि रुक्मिणी यांच्या बदलत्या परस्पर संबंधांचा परिपोष केलेला आहे; परंतु उत्तरार्धात सबंध कथानकाला एक इतिहासप्रणित असे व्यक्तिनिरपेक्ष वळण मिळते. १९३० च्या सुमारास जगभर मंदीची लाट उसळते आणि भारतीय कृषी आणि उद्योगमुद्धा या लाटेखाली सापडतात. युरोपात याच काळात फॅसिझमचा उदय होतो. (हे दाखविणारे 'स्टॉक शॉटस्' मृणालदांनी या भागात योजावयास नको होते; कारण तत्कालीन भारतीय परिस्थितीला हा वैश्विक राजकीय संदर्भ देण्याची गरज नव्हती. येथे मृणालदा आपल्या स्वतःच्या 'डाव्या' राजकीय विचारसरणीला शरण जाऊन कलात्मक सुसंगती व औचित्य क्षणभर विसरून बसलेले आहेत !) रतनलालच्या कारखान्यात राबणारे कामगार आणि ऊस मळ्यातील शेतकरी स्वामी सहजानंदाच्या एका कम्युनिस्ट शिष्याच्या

नेतृत्वाखाली (ही छोटी भूमिका सुप्रसिद्ध बंगाली नाटककार व अभिनेते अजितेश बॅनर्जी यांनी इतर प्रमुख भूमिकांइतकीच अस्सलपणे वठविलेली आहे.) एकजूट करतात आणि आपल्या निकृष्ट आर्थिक परिस्थितीविरुद्ध, पर्यायाने रतनलालच्या भांडवलशाहीविरुद्ध, लढा पुकारतात.

चित्रपटाच्या या भागात विशिष्ट व्यक्तिचित्रांना पूर्वार्धात मिळालेले महत्त्व संपते आणि वर्गविग्रहाच्या संघर्षात त्या काळी ढवळून निघालेला मानवी समूह हाच कथानकाचा नायक बनतो. आयझेन्स्टाइन, पुदोव्हकिन आणि दोव्हझेंको यांच्यासारख्या सोविएत चित्रसृष्टीच्या महान् पाइकांच्या 'मास्-हीरो 'च्या कल्पनेची येथे आठवण येते. जनसमूहाच्या या इतिहासप्रसिद्ध चळवळीचे चित्रीकरण मृणालदांनी इतक्या समर्थपणे आणि कलात्मकपणे केलेले आहे की त्यांची स्वतःची 'डावी' राजकीय मनप्रणाली अत्यंत प्रामाणिक आणि कैक वर्षांच्या बंगाली राजकारणात तावून सुलाखून निघालेली असल्यामुळेच तिच्यापासून स्फूर्ती घेतलेली कलात्मकता इतकी अस्सल दर्जाची ठरली आहे, हे लक्षात येते. इतकी ज्वलंत राजकीय श्रद्धा आणि इतकी अभिजात समाजाभिमुखता श्रेष्ठ कम्युनिस्ट कलावंतांच्या आणि साहित्यिकांच्या अंगी आजवर आपल्याला आढळलेली आहे. 'एक अधूरी कहानी' च्या या सच्चेपणामुळे मृणाल सेन या कलावंतांच्या रांगेत यापुढे सहज बसू शकतील. त्यांच्या चित्रपटात एरवी काहीही दोष असले तरी 'भुवन शोम' सारख्या कलात्मक चित्रपटापेक्षाही मला तो उजवा वाटतो आणि सत्यजित राय यांच्या कलासंचिताची अवघी प्रेरणा मृणालदांच्या तुलनेने 'बूर्ज्वा' वाटते हे येथे आग्रहाने सांगितले पाहिजे.

या लढ्यात संजय ऐन वेळी कच खातो आणि भुकेल्या संपवाल्यांना पैसा वाटण्यासाठी आपल्याकडून तिजोरीच्या चाव्या नेणाऱ्या नेमियारला दगा देतो. रतनलाल शेटजी त्याची पाठ थोपटतात आणि त्याच्या फितुरीचा संपवाल्यांना सुगावा लागल्यास ते त्याला जिवंत ठेवणार नाहीत हे जाणून गुपचूप त्याची कलकत्त्याला रवानगी करतात. संजयचे असे स्खलन होते आणि रुक्मिणीचे अखेर काय झाले हे कळण्यापूर्वीच चित्रपट संपतो. मनाला चटका लावणारी आणि विचाराला चालना देणारी ही कहाणी अधूरीच राहते !

चित्रपटाच्या पूर्वार्धाची गती संथ आहे आणि उत्तरार्धाचे स्वरूप मन विषण्ण करणारे आहे. करमणुकीची अपेक्षा करणाऱ्या, नावाप्रमाणे सामान्य अशा, प्रेक्षकांनी त्याच्या वाटेला जाऊ नये. महाजन यांनी नायकाच्या दिवास्वप्नात अवतरणाऱ्या रुक्मिणीचे एरवीपेक्षा किंचित् जास्त फिकट छटांमध्ये घडविलेले दर्शन अत्यंत लोभसवाणे आहे. संजयच्या खोलीत दिवसा मृणालदांचे युनिट मुक्काम करून राहत आणि रात्री तेथे व दिवसा इतरत्र चित्रीकरण करीत. सबंध चित्रपटाचे चित्रीकरण कलकत्त्यात आणि बिहारच्या एका

गावात, स्टुडिओच्या चार भिंतीआड. झालेले आहे. चित्रपटाचे विजय राघवराव यानी रचलेले संगीत साक्षेपी आहे. रुक्मिणी पडद्यावर दिसते तेव्हा विशेष दर्दभरे वाद्यसंगीत योजून राघवरावांनी तिच्या भूमिकेची सौंदर्यवादी बैठक जास्त स्पष्ट केलेली आहे! (' भुवन शोम ' आणि ' बदनाम बस्ती ' याच्यासारख्या ' न्यू वेव्ह ' चित्रपटांचे अत्यंत कल्पकपणे संगीत दिग्दर्शन करणारे राघवराव रविशंकरांचे शिष्य असून सध्या येथील फिल्म्स डिव्हिजनच्या संगीत विभागाचे प्रमुख आहेत.) संजयला वेढणारे बिहारी गावातील वातावरण मृणालदांनी ज्या प्रत्ययकारीपणाने, नेमियारप्रमाणे ' खऱ्या ' वाटणाऱ्या पात्रांच्या साहृयाने, उभे केलेले आहे तो प्रत्ययकारीपणा त्यांच्या पूर्वीच्या चित्रपटात, त्याचप्रमाणे सत्यजित राय यांच्याही पुष्कळशा कलाकृतीत, आपण अनुभविलेला आहे. या ' निओरिआलिस्ट ' (पूर्णवास्तववादी) अगर ' सिनेमा व्हेरिते ' (सत्यस्थितीदर्शक चित्रपट) तंत्रांचा प्रभाव चक्क शांतारामबापूंच्या, करमणूकप्रधान, ' पिंजरा 'वर सुद्धा पडलेला दिसतो. अशा तंत्राने प्रभावित झालेला एखादा धीट दिग्दर्शक व्यंकटेश माडगूळकरांच्या ' वनगरवाडी 'ला अगर भाऊ पाध्यांच्या ' वासूनाक्या 'ला पडद्यावर आणण्याचा प्रयत्न करील काय? (जयवंत दळवी यांच्या ' चक्र 'चे हक्क अरुण कौल यांच्याकडेच आजघटकेला आहेत.)

थोडक्यात म्हणजे ' एक अधूरी कहानी ' हा एक अत्यंत विचारप्रवर्तक असा कलात्मक चित्रपट आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील नव्या लाटेच्या ' अलीकडच्या संदर्भात त्याचे स्थान आगळे आहेच, परंतु त्याच्या बळावर मृणाल सेन हे ' भुवन शोम 'पेक्षाही जास्त प्रभावितपणे जागतिक कीर्तीच्या चित्रपट दिग्दर्शकांच्या मालिकेतील आपले स्थान सिद्ध करून राहिलेले आहेत. मग भले त्यांचे प्रतिस्पर्धी सत्यजित राय यांना हे स्थान मान्य असो वा नसो!

□ □ □

---

मलपृष्ठ दोनवरील छायाचित्र.
कॅशरच्या भूमिकेत : विवेक चतर्जी

# आता सोलापूर, जळगाव श्रीपूर व सटाणा....

## वासंतिक-हिवाळी वर्गाचे पुढचे पाऊल

सौ. निर्मला पुरंदरे

विद्यार्थी सहाय्यक समिती व इनव्हेस्टमेंट इन मॅन या दोन संस्थांतर्फे गेल्या मे महिन्यात महाविद्यालयीन मुलींसाठी एक वासंतिक वर्ग घेतला होता. 'व्यक्तिमत्व विकास' हा उद्देश असलेल्या वर्गासाठी महाराष्ट्रातून साठ मुली आल्या होत्या. योगासनं, व्याख्यानं प्रात्यक्षिकं, छंदवर्ग, सहली आणि सांस्कृतिक कार्यक्रम असा त्या वर्गाचा कार्यक्रम होता. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या मुलांच्या वसतिगृहातच हा वर्ग घेण्यात आला होता.

तीन आठवड्यांच्या त्या वर्गाचा अनुभव उत्साहवर्धक असाच होता. मुलींना काही प्रश्नावली दिल्या होत्या. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक विषयांवर या मुली कितपत विचार करतात ते अजमावून पहायचं होतं. आणि त्यांनाही त्यांच्या नियमित शिक्षणाव्यतिरिक्त कितीतरी प्रश्नांवर आपण विचार करायला पाहिजे, आपले विचार मांडायला शिकलं पाहिजे ही निकड जाणवून द्यायची होती. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण तूर्त तरी वरील बाबतीत मुलांना विचार करण्यास प्रवृत्त करीत नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा विद्यार्थिनींना शिक्षणातील ही उणीव कमीत कमी लक्षात तरी आणून द्यावी ही संचालक मंडळाची तीव्र इच्छा होती.

मुलींनी प्रश्नावलींची जी उत्तरं लिहिली, चर्चांमधून जी मतं मांडली त्यांवर आधारित वर्ग घेण्याची कल्पना वासंतिक वर्ग संपता संपताच आकार घेऊ लागली होती. त्या वर्गापेक्षा वेगळा अभ्यासक्रम पुढच्या वर्गात घ्यायला हवा हेही तेव्हाच लक्षात आलं.

दुसरा वर्ग हिवाळ्यात घेण्याचं ठरलं आणि याही वर्गाच्या संचलनाची जबाबदारी पहिल्या वर्गाप्रमाणेच सौ. पुरंदरे यांच्यावर टाकण्यात आली. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कार्यकर्त्यांची

भक्कम मदत होतीच. तेव्हा महाविद्यालयांच्या सुट्यांची माहिती घेवून हा दुसरा वर्ग दिवाळीपूर्वी म्हणजे १६ ते ३१ ऑक्टोबर या काळात घ्यावयाचं ठरलं.

'व्यक्तिमत्त्व विकास' हेच उद्दिष्ट असलेल्या या वर्गास महाराष्ट्र, म्हैसूर गुजराथमधून बेचाळीस मुली आल्या होत्या. वासंतिक वर्गात समाजकल्याण खात्यातर्फे काही विद्यार्थीनी आल्या होत्या. मागासवर्गीय अशा या काही मुली, मध्यमवर्गीय व काही आर्थिक दृष्टया चांगल्या परिस्थितीतील मुलींचा वासंतिक वर्गातील मेळ फार चांगला जमला होता, सर्व भेदभाव विसरून काही काळ या मुली सहजीवनाच्या एका मोकळ्या वातावरणात रमून गेल्या होत्या. त्याबरोबर एकमेकींच्या परिस्थितींची माहिती करून घेत होत्या. वासंतिक वर्गातील मुलींनी भरून दिलेल्या उत्तरपत्रिकांमध्ये ह्या परिणामाचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला होता.

समाजकल्याण खात्याच्या अडचणीमुळे हिवाळी वर्गात त्यांच्यातर्फे मुली येऊ शकल्या नाहीत. तर नासिक जिल्ह्यातील डांग सेवा मंडळातर्फे काही आदिवासी मुली आल्या होत्या. जळगाव, सोलापूर, कोल्हापूर, अहमदाबाद, बेळगाव यांसारख्या मोठ्या शहरांमधून तसेच लोणंद, काशीळ, श्रीपूर यांसारख्या लहान गावांतूनही या मुली आल्या होत्या. दुष्काळाच्या परिस्थितीमुळे परीक्षांमध्ये जे बदल झाले त्यांमुळे अगोदर पत्रं येऊनही अनेक मुली येऊ शकल्या नाहीत.

सर्व मुलींची व्यवस्था समितीच्या मुलींच्या वसतिगृहात केली होती. या वर्गातील अभ्यासक्रमासाठी हे वसतिगृहच सोयीचं होतं. पंधरा दिवस या मुली एकत्र रहाणार होत्या. आपापल्या विचारांची देवाण-घेवाण करणार होत्या. वासंतिक वर्गातील तीन मुली याही वर्गासाठी आल्या होत्या. अनेकींची परीक्षांमुळे येऊ शकत नसल्याबद्दल पत्रं आली होती.

कॉलेजमध्ये सतत व्याख्यानांच्या माऱ्यानं हैराण झालेली मुलं, मुली आपण पाहतोच. या पद्धतीत बदल करावा या हेतूनं हिवाळी वर्गात व्याख्यानं जवळजवळ ठेवलीच नव्हती. अठरा ते बावीस वर्षांच्या या मुलींना समाजातील प्रश्नांचा परिचय करून द्यावा, त्यांच्या विचारांना चालना द्यावी, समाजातील सुखदुःखांशी त्यांचं नातं जोडून द्यावं असा दृष्टिकोण संचालकांच्या डोळ्यांसमोर होता. या अनुभवांवर प्रत्येक मुलीनं बोलावं, लिहावं, चर्चेत आपली मतं सुसूत्रपणे मांडायला शिकावं अशी योजना होतीच.

निरनिराळ्या प्रश्नांवर कामं करणाऱ्या सुमारे तीस संस्थांमध्ये संस्थेचे कार्यकर्ते जाऊन भेटले. या संस्थाचालकांनी वर्गातील मुलींच्या छोट्या गटाला संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती द्यावी अशी अपेक्षा होती. प्रत्येक गट या संस्थेत दिवसभर रहाणार होता. जास्तीत जास्त मोकळं व खेळीमेळीचं

वातावरण मिळावं अशी इच्छा व्यक्त केली होती. याचा उद्देश मुलींनी कोणत्याही शंका धीटपणानं विचारण्यास प्रवृत्त व्हावं हा होता.

या संस्थांनी मनापासून सहकार्य दिलं. प्रत्येक गटानं ६।७ संस्था पाहिल्या. दुसरे दिवशीच्या चर्चांमध्ये इतर गटांनी पाहिलेल्या संस्थांची माहिती प्रत्येक गटाला होत असे. काही संस्थांची नावं अशी—समाजवादी महिला सभेचे उद्योगालय, कामगार वस्तीतील केंद्र, साने गुरुजी रुग्णालयातर्फे चाललेले खेड्यातील विकासाचे काम, तसेच हिंगणे आश्रम, महिला सेवाश्राम, रिमांड होम्स्, सेंट क्रिस्पीन्स होम, पंचहौद मिशन, येरवडा इन्डस्ट्रीयल स्कूल, मुंढवा सर्टिफाईड स्कूल, याशिवाय ससून, ताराचंद, साने गुरुजी, वाडिया रुग्णालये आणि पुणे महानगर पालिका, टेलिफोन एक्स्चेंज, पोस्ट, बँक ऑफ महाराष्ट्र, वृत्तपत्रं कार्यालयं वगैरे आवश्यक माहितीच्या संस्थांची कामं.

या संस्थांमध्ये जाताना प्रत्येक गट स्वतंत्रपणे योग्य त्या बसनं जात-येत असे. पुण्यासारख्या मोठ्या शहरात आपण व्यवस्थितपणे वावरू शकतो हा या मुलींना आत्मविश्वास वाटू लागला. संस्था संचालकांशी व तेथील मंडळींशी मोकळेपणानं बोलण्याची तयारी झाली. मुळातच धीट असलेल्या मुलींना तर या पद्धतीचा जास्त उपयोग झाला असं वाटतं.

उत्स्फूर्त नाट्यप्रवेश (रोल प्ले) हा एक बहुतेक मुलींना आवडलेला भाग. ऐनवेळी एखादा विषय सुचवून त्यावर एक प्रसंग मुलींनी उभा करायचा. त्या प्रसंगातली पात्रं मुलींनीच निवडून घ्यायची. तो प्रसंग दहा-पंधरा मिनिटं रंगवायचा. त्यानंतर या प्रसंगात भाग न घेतलेल्या मुलींनी आपापली मतं मांडायची. प्रत्येकजणीनं आपली भूमिका कशी केली, कशी करायला हवी होती, प्रसंगावधान सर्वांत जास्त कुणाचं चांगलं वाटलं वगैरे निरनिराळ्या मुद्द्यांवर प्रत्येक मुलीनं बोलायचं असे. कितीतरी मुली आपापले विचार मुद्देसूद मांडू शकतात हा अनुभव नवीन होता. फक्त सतत अशा संधी मात्र मिळायला हव्यात त्यांना.

याशिवाय आत्मपरिचय (self introduction) हाही कार्यक्रम मुलींना आवडलेला दिसला. वेळेअभावी या कार्यक्रमात काही मुलींनाच स्वत:बद्दल बोलायला मिळालं. या परिचयात जास्तीत जास्त प्रामाणिकपणानं आपली परिस्थिती, स्वभाव, कौटुंबिक परिस्थिती, आशा-अपेक्षा बोलून दाखवाव्यात असं संचालकांनी सुचवलं होतं. या कार्यक्रमात मात्र मुली फारशा मनमोकळेपणानं बोलू शकल्या नाहीत असं दिसलं. कदाचित् मनोगताचा हा प्रकार त्यांना नवीन असावा.

विवाह मार्गदर्शन, हुंडा पद्धती, लैंगिक माहिती या मुलींच्या सध्याच्या वयातील जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरही माहिती व प्रश्नोत्तरे वेळोवेळी होत असत. दिवसभराचा कार्यक्रम साधारणपणे असा—

सनईच्या सुरांनी दिवस उगवत असे. योग्य त्या माहितीसह योगासनांच्या व्यायामानं इतर कार्यक्रमांची सुरुवात होत असे. चहा, नाष्टा झाल्यावर संस्था भेटी किंवा गटवार चर्चा व्हायच्या. दुपारचं जेवण न् त्यानंतर नाट्य प्रवेश किंवा आत्मपरिचय किंवा संस्था भेटींवरील सामूहिक चर्चा. रात्री अंगणातील जेवणाच्या वेळी पुण्यातील निरनिराळ्या क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्ती मुलींबरोबर गप्पा मारायला मुद्दाम बोलावलेली असत. गच्चीवरच्या गप्पांसारख्याच या टेबलावरील गप्पा. एक तासात हा कार्यक्रम झाला की मुलींनी छंदवर्गांची तयारी करायची. हे दोन तास मुलींचे मोठे आवडते तास. चित्रकला, मूर्तीकाम, कागदी फुलं, हस्तकला, बाटिक कला यांचं शिक्षण त्या त्या कलांमधील शिक्षकांकडून मिळे. मुली इतक्या गुंग होत की, बाहेर कोण आलंय, काय चाललंय वगैरेची त्यांना दाद फिर्याद नसे. रात्री दहानंतर समारोप समारंभासाठी सादर करावयाच्या कार्यक्रमाची तयारी मुली करत असत.

वर्गाच्या कार्यक्रमात सतत काहीतरी नाविन्य शोधण्याचा चालकांचा प्रयत्न असे. वर्गाच्या समारोपाच्या दिवशी सकाळी मुलींनी व काही कार्यकर्त्यांनीही ससूनच्या ब्लड बँकेसाठी रक्तदान केलं. मुली अगदी अहमहमिकेनं ओळीमध्ये उभ्या होत्या. संपूर्ण वर्गाच्या कार्यक्रमाला हा सक्रिय समारोप शोभूनच दिसला.

हिवाळी वर्गातील मुलींच्या विचारामध्ये एक प्रामाणिकपणा जाणवला. त्यांनी प्रश्नावली इतक्या मनापासून लिहिल्या आहेत, की त्यांच्या आशा-अपेक्षा, सामाजिक प्रश्नावरील त्यांचे विचार, शिक्षणाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन समजायला फार मदत झाली. याच परस्पर विचारामधून यापुढील कार्यक्रम ठरवण्याचा मार्ग सापडण्यासारखा आहे.

वासंतिक वर्ग आणि नुकताच पार पडलेला हिवाळी वर्ग यांचं फलित काय ? या वर्गामधील मुलींच्याच प्रतिक्रिया सांगितल्या तर त्यातून नेमकं उत्तर मिळू शकेल न् ते खरंखुरं असेल—

जळगावची मिरा लिहिते, 'आपल्या हिवाळी वर्गाचे एक वैशिष्टच मला माझ्या बाजूने सांगता येईल की या अभ्यासक्रमात समाजातील निरनिराळ्या प्रश्नांचं आम्हाला दर्शन झालं. माझ्या मित्रमंडळींना मी हकिकत सांगत असताना माझ्याबरोबर आणलेली माझ्यातील अस्वस्थता मी त्यांच्यापासून लपवू शकले नाही. अशा प्रकारचं शिबीर जळगावला आपण घेऊया असं मी म्हणताच त्यांनी मला लागेल ती मदत करायचं मान्य केलं आहे.'

ही शहापूरची सुमती, पक्क्या व्यवहारी भूमिकेवरून लिहिते,' .. आणखी एक गोष्ट म्हणजे कँपला जाऊन पैसे फुकट गेले नाहीत याबद्दल आमच्या घरातल्या सर्वांचं एक मत आहे.'

मुंबईच्या शहरी जीवनात वावरणाऱ्या सरिताला काय म्हणायचंय पहा. म्हणते, 'पंधरा दिवसांचा हिवाळी वर्ग

खरोखर अविस्मरणीय होता. स्वत:चे काम स्वत: करण्याची सवय मला या दिवसात लागली. शहरी जीवनातली झापडं पंधरा दिवस दूर ठेवून अवती भवतीचं जग पहायला मिळालं. व्यक्तिश: मला सेवाग्रामसारख्या संस्थेत काम करावेसे वाटते.'

वासंतिक वर्गात तिचं पत्रच न मिळाल्यामुळे प्रवेश मिळू न शकलेली सोलापूरची वंदना, हिवाळी वर्गात वाजत गाजत आली.नंतरच्या पत्रात ती म्हणते, 'आज माझं न् नीलूचं सोलापूर येथील 'लक्ष्मी-विष्णू वनिता समाजात' हिवाळी वर्गावर भाषण होणार आहे. येत्या उन्हाळयाच्या सुटीत सोलापूरला वर्ग घेण्याची आपली सर्वांची कल्पना प्रत्यक्षात उतरणार असं दिसतं. मी योगासनं रोज करते. माझं बाटिकचं काम येथे सर्वांना खूप आवडलं. पन्नास रुपयांमध्ये इतकं सर्व तुम्हाला शिकवलं कसं याचं इथे सर्वांना आश्चर्य वाटतंय. श्रीपूरहून आलेली माधुरी साशंकतेनं म्हणते, 'माझ्या गावात अशा प्रकारचा वर्ग घेणं म्हणजे तारेवरची कसरत आहे. परंतु ह्या हिवाळी वर्गात भाग घेतल्यामुळे मला स्वस्थ बसवेल असं वाटत नाही. मी लहान मुलांना व्यायाम, खेळ, अभ्यासाचे महत्व पटवून देवू शकेन. तेथील आमच्या शाळेच्या मुख्याध्यापिकांच्या सहाय्यानं येत्या उन्हाळयाच्या सुटीत विद्यार्थिनींचा वर्ग घ्यायचा प्रयत्न करणार आहे.'

असे अनेक मुलींचे साद-प्रतिसाद आहेत. अशा अनेक उपक्रमांची, निरनिराळ्या प्रयोगांची आवश्यकता किती मोठ्या प्रमाणावर आहे हे अशा निमित्तानं लक्षात येतं. मुला-मुलींमधील आत्मविश्वास, त्यांचं कुतूहल, त्यांची सामाजिक प्रश्नाबाबतची सहानुभूती त्यांच्या मनात जागी झाली तर ती स्वत: पुढाकार घेऊन अशा योजना राबवू शकतील.

वरच्या पत्रामधील उताऱ्यावरून पुढच्या उन्हाळयाच्या सुटीत सोलापूर, जळगाव, श्रीपूर व कदाचित सटाणा येथे असे वर्ग मुलींच्याच पुढाकारात होतील असे दिसते. या उत्साही मुलींसाठी त्यांच्या परीक्षा झाल्यावरोबर एक चार–पाच दिवसांचा मार्गदर्शक वर्ग (leadership camp) घ्यायच्या विचारात संचालकमंडळ आहे. वर्ग चालवण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन त्यांना द्यावं हा उद्देश.

□ □ □

# आ ले पा क

■ मुंबईतील बसगाड्यांमध्ये स्त्रियांसाठी काही राखीव जागा ठेवण्याची एक योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली होती. ही योजना ताबडतोब रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

स्त्रियांसाठी राखीव असलेल्या जागांवर स्त्रियाच बसू लागल्यामुळे तर हा निर्णय घ्यावा लागला नाही ना ?

■ 'रक्त नको मज प्रेम हवे' या नाटकाच्या एका परीक्षणात म्हटले आहे : आक्रमक चीनबद्दल आम्हाला राग अवश्य असला तरी परकीय मिशनऱ्यांबद्दल आम्हाला प्रेम नाही. त्यामुळे हे नाटक बिलकुल आपले वाटत नाही.

मिशनऱ्यांचे सोडा; परकीय नाटके आपल्याला अधिक आपली वाटतात की नाही ?

■ 'बावरली हरिणी' हे सौ. कुमुद चासकरांचे नवे, स्वतंत्र, सामाजिक नाटक नुकतेच रंगभूमीवर आले आहे. या नाटकाचा कोणाही जिवंत वा मृत व्यक्तीच्या जीवनाशी संबंध नाही, असे लेखिका सांगते.

ती सांगते; तुम्ही ऐका !

■ मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजच्या आवारातील हॉटेलवजा कृत्रिम गुहेत तरूण-तरुणींना अमली पदार्थ सेवन करायची व्यवस्था करण्यात आली आहे काय ? : हा प्रश्न विधानसभेत विचारण्यात आला.

तरुण आणि तरुणी हेच मुळात पुरेसे अमली पदार्थ नाहीत काय ?

■ जनसंघाचे अध्यक्ष म्हणतात : प्रत्येकाला रोजगार मिळाला पाहिजे.

मी म्हणतो : प्रत्येकाला काम न करताही रोजगार मिळाला पाहिजे.

■ श्री. विजय मर्चंट म्हणाले : शतकवीरांचे अभिनंदन करण्यासाठी मैदानात घुसणाऱ्या प्रेक्षकांपासून खेळाडूंना वाचविले जावे.

चुंबन घेणाऱ्या प्रेक्षकांनी काय करावे ?

■ एका व्याख्यानातील संदर्भ : कोणत्याही राष्ट्राजवळ निव्वळ युद्धनौका व शस्त्रास्त्रे असून भागत नाही.

बरोबर आहे. नौदलसैनिकांना पांढराशुभ्र गणवेषदेखील देणे आवश्यक असते.

■ 'पिंजरा' बोलपटाची तिकिटे काळ्या बाजाराने विकल्याबद्दल डोंबिवली येथे

दोघांना दंड झाला.

बोलपट रंगीत असला की त्याचा पांढरा-काळा बाजार नेहमी तेजीत असतो.

■ एक बातमी : नुकत्याच साजऱ्या झालेल्या नाटयाचार्य काकासाहेब खाडिलकर जन्मशताब्दी–व्याख्यान-मालेत 'नाटककार खाडिलकर' या विषयावर प्रा. वा. ल. कुळकर्णी यांचे व्याख्यान झाले. मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयात झालेल्या व्याख्यानाला संग्रहालयाच्या नाटयशिक्षण वर्गातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

■ महाराष्ट्रातील ५४ विद्वानांनी नवी मुंबई प्रकल्पाला विरोध करणारे एक निवेदन राज्य सरकारला सादर केले आहे.

महाराष्ट्रात विद्वान किती आहेत ते एकदा नेमके निश्चित करायला हवे; म्हणजे सगळी निवेदने काढण्याचे काम त्यांच्याकडे सोपवता येईल.

■ सगळे सांगतात, मी ऐकतो : 'गेल्या पंचवीस वर्षात श्रीमंतवर्ग अधिक श्रीमंत झाला आहे; गरीब वर्ग अधिक गरीब झाला आहे.'

मध्यमवर्ग अधिक मध्यम झाला आहे, हे का कोणी सांगत नाही ?

■ 'आचार्य अत्रे : विनोद व तत्त्वज्ञान' या विषयावरील व्याख्यानात एक प्राध्यापक म्हणाले : आचार्य अत्रे यांचा विनोद कोल्हटकरी परंपरेतला असला तरी त्याची जातकुळी वेगळी आहे.

या वक्त्याची परंपराच नव्हे तर जातकुळीही प्राध्यापकीय दिसते.

■ मॉस्को नभोवाणीचे श्री. नरेंद्र सिंदकर म्हणाले की आकाशवाणीच्या मुंबई व पुणे केंद्रावरून ऐकू येणाऱ्या मराठीपेक्षा मॉस्को नभोवाणीवरील मराठी अधिक शुद्ध, अविकृत व बाळबोध असते.

या निष्कर्षाबद्दल श्री. सिंदकर यांना आपण मॉस्को-डी-गामा का म्हणायचे नाही ?

■ श्री. व्ही. शांताराम एका सत्कार-प्रसंगी म्हणाले : 'पिंजरा' चित्रपटाने यशाच्या व उत्पन्नाच्या बाबतीत आत्ता-पर्यंतचे सर्व विक्रम मोडले, हा चित्रपट इतका चालला अशा त्यात कोणत्या गोष्टी होत्या म्हणून हे यश मिळाले, याचा मी मनाशी विचार करत आहे.

खरे म्हणजे 'पिंजरा' चित्रपटात काय आहे यापेक्षा काय नाही याचा विचार शांतारामबापूंनी करावा.

■ एस. टी. तून प्रवास करताना ज्यांचा प्रेमविवाह जमला असेल त्यांनी आपली प्रेमकहाणी लिहून पाठवायचे आवाहन एस्. टी. ने केले होते.

एस्. टी. तून प्रवास करताना ज्यांचे प्रेम जमले; ते प्रेम विवाहाच्या मुक्कामावर पोचलेच नाही, अशांनी काय करायचे ?

आमचे तर अर्ध्या प्रवासात प्रेम

जमले, पण पुढच्या प्रवासात ते मोडले— आम्ही काय लिहायचे ?

■ आरोग्यमंत्री डॉ. रफिक झकेरिया यांनी विधानसभेत सांगितले की जे. जे. हॉस्पिटलमध्ये एक रुग्ण सतरा वर्षे राहिला.

तो सतरा वर्षे रुग्ण राहिला ?

■ बंगलोर महापौरांचे म्हणणे असे की कामकाज चालू असता सभासदाने झोपण्यास हरकत नाही; पण त्यांनी घोरू मात्र नये.

जेवा पण मिटक्या मारू नका असे एखाद्याला कसे सांगवते कुणास ठाऊक.

■ महाराष्ट्र विधानसभेतील एका चर्चेत गोविंदराव आदिक यांनी श्री. यशवंतराव मोहिते यांचा 'महाराष्ट्राचे कार्ल मार्क्स' असा उल्लेख केला.

कार्ल मार्क्सची खरी योग्यता आज आपल्याला समजली. इतकी वर्षे वाट पाहिल्याचे सार्थक झाले. अहाहा. ◻

## अनावश्यक शस्त्रक्रिया

शस्त्रक्रियेची पाळी अजूनपर्यंत तुमच्यावर आली नसेल तर तुम्ही स्वतःला बेशक भाग्यवान समजू शकता. शस्त्रक्रिया कधी तुमचा जीव वाचवते; कधी जीव घेते. ज्यावेळी ती तुमचा जीव वाचवते त्यावेळीदेखील ती तुम्हाला अर्धमेले करतेच. त्याहीपेक्षा भयंकर गोष्ट अशी की जीव वाचवणाऱ्या आणि जीव घेणाऱ्या कित्येक शस्त्रक्रिया अनावश्यकच असतात. आमचे म्हणणे तुम्ही कदाचित मानणार नाही; म्हणून 'मनीजवर्थ' या अमेरिकन पाक्षिकातील माहिती तुमच्यापुढे ठेवतो.

अमेरिकेत प्रतिवर्षी केल्या जाणाऱ्या चौदा लाख शस्त्रक्रियांपैकी किमान दोन लाख तरी सर्वथा अनावश्यक असतात, असे या पाक्षिकात म्हटले आहे. टॉन्सिलेक्टोमी ही शस्त्रक्रिया आपल्याला चांगली माहिती आहे. टॉन्सिल्स काढल्यावर मुलांची खुंटलेली वाढ पूर्ववत चालू होते, अशी काही उदाहरणे आपण पहातो. परंतु विकसित वैद्यकीय ज्ञानानुसार टॉन्सिल्स आणि वाढ खुंटणे वा सर्दी-खोकला होणे, सारखा ताप येणे यांचा कारण-परिणामसंबंध नाही. तरीही जवळजवळ एकतृतीयांश मुलांवर टॉन्सीलेक्टोमी करण्यात येते. त्यापैकी जेमतेम दोन किंवा तीनच टक्के मुलांच्या बाबतीत ती आवश्यक असते.

एका लहानशा कुटुंबात, एका विशिष्ट काळात, आठ शस्त्रक्रियांचा सल्ला भिन्न भिन्न वैद्यकविशारदांनी दिला. कुटुंबप्रमुखाने एका कानाने सल्ला ऐकला आणि दुसऱ्या कानाने सोडून दिला. त्या शस्त्रक्रिया झाल्या नाहीत. ज्यांच्यावर त्या होणार होत्या ती कुटुंबातील माणसे सुखरूप आहेत. त्या कुटुंबप्रमुखाला एवढा धीर झाला कारण तो स्वतः डॉक्टर होता आणि डॉक्टरांचा शस्त्रक्रियांचा हव्यास त्याला चांगला ठाऊक होता !

असा कुटुंबप्रमुख सगळ्यांना कसा मिळणार ? कारण आपल्या सगळ्यांचे नाव 'तळवलकर' थोडेच आहे ? ◻

## दादा आणि दादू

महाराष्ट्र हा महान प्रदेश आहे असे आपण सहजच मानतो. महाराष्ट्रात सगळेच मोठे: डोंगर मोठे; नद्या मोठ्या; शहरे मोठी; संस्था मोठ्या; हे मोठे; ते मोठे. आणि मुख्य म्हणजे माणसे मोठी. तुमच्या-माझ्यासारखी छोटी माणसे सोडली तरी महाराष्ट्रात मोठ्या माणसांचा दुष्काळ कधीच नसतो. मोठेपणाचे सर्वात प्रमुख लक्षण म्हणजे स्व–तंत्र बाणा. महाराष्ट्रातील सगळी मोठी माणसे स्व–तंत्र बाण्याचीच असतात. त्यातही कलावंतांची स्थिती तर आभाळातून पडले आणि या दगडा-धोंड्यांच्या प्रदेशाने झेलले अशी असते. ते कोणाला गुरू मानत नाहीत; ते कोणाचे शिष्य नसतात. सोप्या मराठीत सांगायचे तर सारे महाराष्ट्रीय कलावंत 'ओरिजिनल' असतात.

दादा कोंडके हा देखील असाच एकदम 'ओरिजिनल' माणूस. 'विच्छा माझी पुरी करा' आले आणि दादांचे टक्कल भर्जरी मंदिलाने झाकले. आम्ही दादांचा कार्यक्रम पुन्हा पुन्हा पाहिला. मग कोणीतरी दादांचे गुरू दादू इंदुरीकर यांचा कार्यक्रम पाहायची फर्माईश केली. तोपर्यंत दादांना कोणी गुरु आहे. हे आम्हाला ठाऊकच नव्हते. आम्हाला वाटायचे दादाच सगळ्यांचे गुरू. संधी मिळाली तेव्हा दादू इंदुरीकरांचे 'गाढवाचे लग्न' पाहिले. तेही आवडले काही दिवसांपूर्वी एका प्रश्नोत्तरीच्या कार्यक्रमात, दादू इंदुरीकर आपले गुरु नाहीत, तरी ते तसे सांगतात कारण त्यामुळे चार पैसे सहज जास्त मिळतात, असे दादा म्हणाले.

आता दादू इंदुरीकरांनी, एका मुलाखतीत, या गुरुशिष्य नात्याबद्दल खुलासा केला आहे: दादा कोंडके म्हणे पूर्वी दादूंचे कार्यक्रम चोरून पहायचे आणि त्यांचे अनुकरण 'जनता कला पथका'-च्या रंगमंचावर करायचे. स्वतः दादांनीच एकलव्यतेची ही हकीकत आपल्याला सांगितली असे इंदुरीकरांचे म्हणणे. आणखी एक-दोन वेळादेखील काही सज्जनांच्या उपस्थितीत, आपला गुरु म्हणून आदरपूर्वक उल्लेख दादांनी केला असे दादू सांगतात.

खरा प्रकार काय आहे ते दादा आणि दादू सांगणार नाहीत, (कारण त्यांना तो ठाऊक आहे); मीसुद्धा सांगणार नाही. (कारण मला तो ठाऊक नाही.)

तूर्त एवढेच म्हणतो की दादा कोंडके कोणा दादू इंदुरीकरांचे शिष्य आहेत असे कळले म्हणून त्यांच्या ओरिजिनॅलिटीला थोडासुद्धा धक्का लागणार नाही; आणि दादा कोंडके यांचे नाव सांगून चार पैसे सहज जास्त मिळाले तरी तेवढ्याने दादू इंदुरीकरांचा स्वतःचा चेहेरा साफ पुसला जाणार नाही!

—अनंतराव

पाण्यावरून दंगली सुद्धा होतील...

# अ-काली आव्हान

प्रा. राम बिवलकर

गेल्या महिन्यात महाराष्ट्रातील पुणे, नगर, औरंगाबाद, ठाणे, कुलाबा, नाशिक, जळगाव, धुळे इतक्या जिल्ह्यातून प्रवास करण्याची संधी मिळाली. अवघ्या महाराष्ट्रावर दुष्काळाची भयंकर सावली पडली असता ते सावट प्रत्यक्षीकृत करण्याचे--भाग्य तरी कसे म्हणू ?--पण ते दुर्भाग्यही नव्हते--

देशावर दुष्काळाची छाया अनेकवार येते. प्रतिवर्षी कुठे न् कुठे तरी पाऊस फसवतो. तिथले जीवन विस्कळीत करतो. सरकारी मदतीचा ओघ तिकडे वाहातो. कित्येकदा सरकारी मदत मिळविण्याकरताच दुष्काळ पाडलेही जातात ! (मध्यंतरी दुष्काळ कसे पाडतात त्याचे साद्यंत विवेचन नाशिकच्या श्री. काकासाहेब वाघ यांनी जाहीरपणे केले होते,. ते सर्वांच्या स्मरणात असेलच !) त्यामुळे दुष्काळाचे भयंकर स्वरूप कधी प्रत्ययाला आले नव्हते. यंदा पाऊस जून अखेरीस आला. आला तो पूर घेऊन आला. कोकणातली जीव धरून असलेली भाताची आवणेच त्याने वाहून नेली. आवणे पुन्हा तयार करणे शक्य नव्हते. हाती लागली त्यांचे जुडगे शक्य तिथे रोवले गेले. पण मग नंतर पावसानेच काळे केले ! पोटरीवर आलेली पिके पिवळी पडली. लोंब्या फुटल्या तिथे त्या पोच्या होत्या. ६-८ आणे पीक हाती लागते की नाही याची वानवा त्याने निर्माण केली. उत्तरा पडल्या नाहीत. हस्त कोरडे गेले. स्वातीचे शिपडण अनेक ठिकाणी झाले पण ते गरव्याला निजवणारे, शेतात राहिलेल्या हळव्याला कुजवणारे होते. पाण्याचे दुर्भिक्ष्य सरवणारे नव्हते. त्यामुळे कधी नव्हे ती कोकणात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. भयंकर परिस्थिती !--कारण एकपिकी कोकणात खरीप पीक गेले म्हणजे उपासच पदरी येणार आणि पाण्याचाही तुटवडा पडणार असल्याने तो ' निर्जली उपास ' ठरणार !

पावसाभावी गवत नाही. पिकाभावी

पेंढा नाही. पाणी नाही. मग माणसे जगणार कशी ? माणसांना एक सरकारने धान्य पुरविले, तरी पाणी कसे पुरवणार ? गुरांना वैरणकाडी कशी मिळणार ? १९१८ नंतर इतकी प्रखर दुष्काळी परिस्थिती कोकणात निर्माण झाली नव्हती.

नगरचे काही साखर-तालुके वगळले तर काय दिसले-जिल्ह्यातून फिरताना ? कोरडी ठाक पडलेली नद्या-नाल्यांची पात्रे. त्यातून पाणी मिळविण्याचा फुका प्रयत्न म्हणून ऑक्टोबरमध्येच लोकांनी त्या पात्रात खणलेले डवरे. कोरडे पडलेले पाझर तलाव! मैलोगणती उजाड पडलेले काळे रान ! पाऊसच नाही तर हिरवी काडी तरी दिसावी कशी ? ठिकठिकाणी दुष्काळी कामांच्या जत्रा भरलेल्या दिसत होत्या. कुठे तळे खोदणे चालले होते. कुठे रस्ते तयार होत होते. कुठे मुख्य रस्ता रुंद करण्याचे कार्य चालले होते. पण सारे वातावरण भकास, उजाड दिसत होते.

नगर सोडून आमची गाडी औरंगाबादच्या रोखाने धावू लागली तरी चित्रात बदल झाला नाही. त्यात भरले गेले ते अधिक करूण परिस्थितीचे गडद रंग ! हाडाचे सांगाडे झालेली गाईगुरे गाढवासारखी माती फुंकीत काही तरी चरत होती. बरोबरचे श्री. नानासाहेब टिपणीस म्हणाले, 'ही सारी गुरे आता काडी-काटयावर जगली तरी जूनमध्ये पाऊस आला की ती सारी तडकाफडकी मरतील.'

'पाऊस आला की मरतील ?'

माझ्या प्रश्नावर ते लगेच म्हणाले- 'हो पाऊस आला की मगच ही मरायची. या काड्या ही खाताहेत. त्याच्या बरोबर ही काळीशार चिकणमाती त्यांच्या पोटात जातेय्. ती माती त्यांची आतडी धरून बसेल. जूनमध्ये पोटभर पाणी मिळाले की ती आतड्यांचे वॉल्स् धरून बसणार आणि मग पोट फुगून ही जनावरे मरणार. दुष्काळात हेच वाईट असते बिवलकर.'

खूप हाडकी जनावरांचा एक तांडा नगरकडे चालला होता. गाडी थांबवून आम्ही तांड्याबरोबरच्या लोकांना विचारले,

'कुठं ?'

'बाजाराला.'

'गुरे विकणार ?'

'मग त्यांना काय घालणार ? पाणी कसे दावणार ?'

'काय भाव येईल ?'

'मातीचा !'

'म्हणजे ?'

'अहो काय राव पुसता ? हजाराची जोडी पन्नासाला गेली म्हणजे मातीच नव्हे का ?'

'हजाराची जोडी पन्नासाला ?'

'डोळ्यादेखत त्यांचे मरण बघवेना म्हणून द्यायची.'

### वाट फुटेल तिकडे

त्याच्या अन् आमच्या डोळ्यात पाणी आले-नगरला डॉ. हळबे भेटले होते. तेव्हा अशा जनावरांना चाऱ्याच्या भागात हलविण्याची कल्पना नानांनी त्यांच्याजवळ बोलून दाखविली होती.

पण ते म्हणाले, 'हे काम ऑर्गनाइझ कुणी करायचे ? लोक तयार झाले पाहिजेत ना ? एवढा दुष्काळ पडलाय् तरी माणसे स्वार्थ विसरायला तयार नाहीत. दुष्काळी कामावर प्रत्यक्ष ३००, कागदावर ८०० असे प्रकार दिसतातच ना ?'

गाडी पुढे निघाली. आता वाटेत खूप बैलगाड्या भेटत होत्या. बऱ्याच ठिकाणी दुष्काळी कामेही चालू होती. बैलगाड्यातून कुटुंबेच्या कुटुंबे कुठेतरी निघाली होती. गाडीत माणसांबरोबर त्यांची गाडगी, मडकी, खुराडी, ट्रंका, बाजली, गाठोडी असे संसाराचे सामान दिसत होते. माणसे संसार मोडून कुठे निघाली होती ? नाना म्हणाले, 'ऑक्टोबर-नोव्हेंबरात साखर कारखाने चालू होतात. ही सारी मंडळी ५।७ महिने साखर कारखान्यांच्या गावी राहायला निघालेली दिसतात. ऊस कापणी, वाहातूक असे खूप मजुरीचे काम तिथे उपलब्ध होते. प्रतिवर्षीचाच त्यांचा तो रिवाज आहे. कारखाने बंद झाले की, ही मंडळी आपापल्या गावी परततात.'

पण भेटणाऱ्या गाड्यांची संख्या खूप होती. नानांनी दिलेले स्पष्टीकरण पटले होते तरी पोचले नव्हते. साखर कारखान्यांच्या कामावर एवढी रीघ ? एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्थलांतर ? म्हणून एकदा खूप मोठा गाड्यांचा काफिला लागला तेव्हा आम्ही आमची गाडी थांबवली. एकदोघा गाडीवानांना जवळ बोलावले–

'राम राम. तुम्ही सारी मंडळी कुठे निघालात ? साखर कारखान्याला ?'

त्यांनी नकारदर्शक माना हलवल्या.

'मग कुठे ?' विवर्ण झालेल्या चेहऱ्याने एकजण म्हणाला, 'वाट फुटेल तिकडे ! जिथे काम मिळेल, अन्न मिळेल, पाणी मिळेल–तिथे.'

'गाव सोडून निघालात ?'

'काय करायचे गावाला चिकटून ? हातावरचे पोट आमचे. वारिश झालीच नाही. खरिप पेरलंच नाही. काम कसे मिळणार ? पोट कसे जळणार ? पाणीसुद्धा नाही गावात.'

'कितीजण निघालात ?'

'आमच्या गावचे सारेच मजुरदार आम्ही. कैक गावांची हीच परिस्थिती आहे साहेब. आपण कोठले ?'

'कोकणातले.'

'बरे आहे पीकपाणी ?'

'दुष्काळ सगळीकडेच आहे.'

'त्येबी खरंच.'

गाडी औरंगाबादच्या दिशेने धावू लागली. दिशाहीन 'निघालेल्या गाड्या भेटत होत्या. पण आता त्यांना काही विचारावेसे वाटत नव्हते. दोन्ही बाजूचे उजाड माळरान निरखीत स्वस्थ बसलो होतो.

गाडी औरंगाबादला पोचली. तिथे एस्. टी. च्या थांब्यावर आम्हाला काही मंडळी रिसीव्ह करणार होती. म्हणून आम्ही स्टँण्डवर गेलो.नमस्कार-चमत्कार होताहेत, मंडळी नानांचे स्वागत करताहेत, तो मी तहान लागली म्हणून स्टँण्डवरच्या कॅण्टीनमध्ये पाणी प्यायला

गेलो. एका टेबलावर अर्धवट पाणी पिऊन ठेवलेले बरेचसे ग्लास विसळायचे राहिले होते. मी बॉयला म्हणालो, ' मला पाणी हवे आहे. ' त्याने तत्परतेने एक जग आणला. टेबलावरल्या अर्ध्या भरल्या ग्लासात आणखी पाणी ओतून त्याने ग्लास भरला. म्हणाला, ' घ्या साहेब ' उष्टचा ग्लासांत पाणी ? माझ्या अंगावर शहारे आले. मी म्हणालो,

' ग्लास न विसळताच पाणी का ओतलंस ? दुसरा स्वच्छ ग्लास आण. '

' पाणी फुकट घालवून चालत नाही साहेब. दोन रुपये मोजूनही हंडाभर पाणी मिळत नाही. '

' मग काय उष्टे पाणी प्यायचे ?'

' नाविलाज साहेब ' मी कॅण्टीन मॅनेजरकडे तक्रार नेली. तो म्हणाला, ' लाज वाटते सांगायला. पण साहेब आम्ही दिलगीर आहोत. '

मी पाणी न पिताच कॅण्टीनमधून बाहेर पडलो. नाना व्ही. आय. पी. होते. त्यांच्याबरोबर आमची सोयही ' सराई 'वर केली गेली. रात्री मुक्काम तिथेच पडायचा असल्याने आम्ही सूट-केसिस खोलीत आणून टाकल्या. हुश्शऽऽ करून डनलॉपच्या गाद्यावर आडवारलो आणि प्रथम नोकराला हाक मारली.

' वेराऽऽ '

' जी ' म्हणून तो समोर उभा राहिल्यावर मी त्याला म्हणालो,

' थंडगार फ्रीजमधले पाणी आण प्यायला. '

वेरा गेला. पाच मिनिटे झाली. दहा व्हायला आली. पाणी येईना. एकदोनदा तो वेरा इकडून तिकडे वावरताना दिसला. मी त्याला हटकले,

' वेरा, तुला पाणी आणायला सांगितले ना ?'

तो चाचरला. म्हणाला,

' किती ग्लासे आणू साहेब ?'

' ग्लासांचा काय हिशेब विचारतोस ? दोनचार ग्लासे आणि एक जग-भर पाणी आण '

' तुम्ही किती मंडळी इथे आहात साहेब ?'

' तिघे '

तो पळाला. थोडयाच वेळात ३ ग्लासे आणि दोन बाटल्या पाणी घेऊन आला. म्हणाला,

' सकाळपर्यंत पुरवा साहेब '

## वॉटर रायट्स

मी आश्चर्याचा पुतळा बनलो. ' सराई ' सारख्या वातानुकूलीत खोल्या असलेल्या होटेलमध्ये पाण्याचे रेशनिंग ! मी रूमला अटॅच्ड असलेल्या सॅनिटरी ब्लॉकमध्ये गेलो. तिथे तीन हिरव्या प्लॅस्टिकच्या बादल्या भरून पाणी ठेवले होते. तेही रात्रभराचे आमचे रेशन होते ! आणि ही परिस्थिती औरंगाबादेसारख्या शहरात. एका अलिशान होटेलमध्ये ! हातावरचे पोट असणारी, मध्यमवर्गीय मंडळी आज पाण्याचे एवढे दुर्भिक्ष्य असले तर एप्रील-मे मध्ये पाण्याकरता कशी तडफडून मरतील याचे भीषण चित्र माझ्या डोळयासमोर उभे राहिले.

उत्तर सायंकाळी दुष्काळाची चर्चा निघाली तेव्हा प्राचार्य चिटणीस म्हणाले,

' यंदा या भागात ' वॉटर रॉयट्स् ' होतील. पाण्याच्या ग्लासाकरता हाड-काच्या तुकडयासाठी कुत्री जशी एक-

मेकांवर तुटून पडतात तशी माणसे एकमेकांवर हल्ले चढवतील'

चित्र मोठे भेसूर होते. ठाण्यात काय, नाशकात काय, खरीप पिके पार बुडाली होती. शेतमजूरी करणाऱ्यांना ना मजूरी, ना अन्न, ना पाणी अशी स्थिती होती. त्यातच त्यांच्या दुर्दैवाचा फायदा उठविणारे धनिक जमिनदार, मालदार व्यापारी, त्यांना छळीत होते. गुरे तर मातीमोलाने विकली जात होती. उद्या पोरे नाही पण बायका विकायची पाळी या गरीब जनतेवर येणार होती. चार भिंतीस घुसमटविलेल्या वा उजाड माळरानावर घडलेल्या तसल्या खुशीच्या सक्तीच्या कथाही कुठे कुठे ऐकू आल्या.

पण मी खानदेशात गेलो, तिथे चित्र अगदी निराळे होते. जिथे वीस इंच पाऊस पडायचा तिथे दहाच इंच पडला होता, पण वेळेवारी पडला होता. त्यामुळे खरीप पिके भरघोस आली होती. ज्वार, बाजरी, भुईमूग, कपाशी, तूर, कडधान्येही छान आली होती. पाट वाळले होते. कारण घरणातून पाणी कमी होते. पण खानदेशी सधन शेतकरी पाटावर अवलंबून नाही. प्रत्येकाच्या विहीरी मळ्यामळ्यातून खोदलेल्या आहेत. विजेरी पंप जिथे तिथे बसले आहेत. त्यामुळे ३७ दिवस पाऊस पळाला तरी ती मंडळी ज्वारी बाजरीला एखाद दुसरे पाणी दाखवू न शकली.काही पावसावरच्या जमिनीतील पिके कमी आली पण एकंदरीत शेतकरी खुशीत दिसला. एक नोव्हेंबरपासून लेव्ही बसण्या अगोदरच आपला माल बाजारात नेऊन घालण्यात गुंग दिसला. बाजरीला ६५।७० रुपये क्विंटलचा, ज्वारीला ८०।९० चा, भुईमुगांच्या शेंगाना १७५।२०० चा व केळ्यांना ४४।४५ रुपये क्विंटलचा भाव मिळाल्याने खुशीत दिसला.

दिवाळी आधी स्वातीचा पाऊस सर्वत्र झाला तेव्हा आता रब्बीचे मोती पिकतील म्हणून तो आनंदला. दादरा, गहू, कपाशी पेरून मोकळा झाला. इतरत्र दुष्काळ असल्याने रब्बी पिकेही खूप पैसे देऊन जातील याची खात्री त्याला आली आहे. कपाशीच्या एकाधिकार खरेदीचे भाव त्याला मान्य नाहीत पण कुठे कशा कळा फिरवून कमी प्रतीच्या मालाला वरची ग्रेड आणि चढा भाव कसा मिळवावा हे त्यांना आता माहीत झाले आहे! अमळनेर, पिंपळनेर, एरंडोल, चोपडे, भुसावळ–सारे तालुके प्रफुल्ल चेहऱ्याचे दिसले. इतरत्र भयाण दुष्काळ पडल्याच्या बातम्या ऐकून ते चुकचुकतात पण आत कुठेतरी आनंदतात असे माझ्या प्रत्ययाला आले.

महाराष्ट्रभर दुष्काळी कामे जोरात चालू झाली आहेत. त्यावर २७ लाख माणसांना काम मिळाल्याचे सरकारी आकडे सांगतात. दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी मुख्यमंत्र्यांपासून अनेकांनी फंड जमवायला सुरवात केली आहे. कोकणरेल्वे बांधणीसारखे काम दुष्काळी काम म्हणून अंगावर घ्यावे म्हणून महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे मागणी केले आहे. केंद्रीय मदतही मोठ्या प्रमाणावर मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. विद्यापीठीय व शालेय परीक्षा मार्चअखेरीस संपविण्याची घणाघाईही सुरू झाली आहे.

## दत्तक कुटुंबे

पण दुष्काळाच्या या घणाघाईत किती प्रकारचे अपहार चालू आहेत याचा विचार मनात आला की मत विषण्ण होते. हे फंड, ही दुष्काळी कामे, या मदती, खरोखर आर्थिकदृष्टचा दुर्बल घटकांपर्यंत पोचतील का? आजच्या शासनाच्या पद्धती व अंमलबजावणीवरून ते शक्य दिसत नाही. गरीब, दलित पार चिरडला जाणार, टाचा घाशीत मरणार असे चित्र दिसत आहे.

'मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळनिधीला करमुक्त देणगी देऊन आपले कर्तव्य संपले का?' मनात आलेला प्रश्न साळव्याच्या श्री. देवरामभाऊ नारखेडचांच्यापुढे शब्दगत झाला.

'मुळीच नाही. तसल्या फंडाला पैसे देऊ नयेत असेच माझे मत आहे पण काय करून आपद्ग्रस्तांना मदत पोचविता येईल हे मात्र सुचत नाही.'

'मी सुचवू?

माझी कल्पना अशी की सरकारने या राज्यातील सधन शेतकरी मंडळींना आवाहन करून दुष्काळ काळात ४।५ दुष्काळग्रस्त कुटुंबांना दत्तक घ्यायला लावावे. या काळात ही मंडळी तुमच्या शेतावर राबतील. त्यांना जेऊन खाऊन योग्य मेहनताना त्यांच्या श्रमाबद्दल मिळावा. तुमचाही मजुरांचा प्रश्न सुटला. त्यांच्याही पोटापाण्याची सोय झाली. दुष्काळाच्या काळात त्यांचे अन्न, पाणी, निवारा, वस्त्र या साऱ्या मूलभूत गरजा भागविण्याची जबाबदारी दत्तक बापाची.'

क्षणभर विचार करून देवरामभाऊ म्हणाले,

'आपल्याला आवडली तुमची कल्पना. पण अशी चांगली कल्पना प्रत्यक्षात उतरू म्हणाल, तरी तिच्या मार्गात कैक झारीतले शुक्राचार्य येतील त्याचे काय?'

'त्या शुक्राचार्यांचे डोळे फोडणे हे तुमच्यासारख्या समाजकार्यकर्त्यांचे काम आहे.'

'पण आज शुक्राचार्यच शासक आहेत शासनातील अधिकारी आहेत. आम्ही डोळे फोडायला गेलो तर आमचाच अशोकपुत्र कुणाल करतील हे.'

'तुम्ही हातपाय गाळता भाऊ? घाबरता शासनाला?'

'चार वर्षे फाशी कोठडीत काढली तेव्हाच जिवाची भीती संपली दादा. मी माझी चामडी बचवावी म्हणून नाही बोललो. पण असे अनेक निघायला हवेत.'


'दिव्याने दिवा पेटेल.'

'पेटला तर उत्तमच नाहीतर मूळ दिव्यातले तेल सरेल, वात जळेल आणि शेवटी भडकून तोच सरेल, गुरुजींसारखा!'

देवरामभाऊ सत्यस्थिती बोलत होते. मी विषण्ण मनाने ऐकत होतो — मनात आले की एकंदरीत महाराष्ट्रात फक्त अन्नपाण्याचाच दुष्काळ नाही, सहृदयता आणि कर्तृत्व यांचाही दुष्काळच आहे!

□ □ □

# एक दुर्धर मुलगी



# भास्कर उत्तरवार

## जर्नॅलिझमच्या वर्गाचा पहिला दिवस

परस्परांशी परिचय करून घेण्यात गुंतलेले विद्यार्थी आणि विद्यार्थिनी. महाविद्यालयाला शोभेल असा गोंगाट. इतर विद्यार्थ्यांबरोबर मीही त्या गोंगाटात सामील झालेलो.

एक एक नवीन चेहरा येतो. वर्गात कुठल्यातरी डेस्कशी बसतो. हळूहळू आपलं नाव सांगत त्या गोंगाटात सामील होतो. नवीन स्टेशनवर गाडीत चढल्यावर डब्याचा एक भाग होऊन जाईपर्यंत उतारू वागतात तशी सगळ्यांची वागणूक.

पाच-दहा मिनिटं जातात.

अर्धवट उघडा असलेला दरवाजा पूर्ण उघडतो. एक चांगली साडेपाच फुटापेक्षा अधिक उंचीत बसेल अशी अंगपिंडानं भरलेली सावळ्या रंगाची धारदार मुलगी येते. आल्या आल्या वर्गभर नजर फिरवते. मागील रांगेतील एक डेस्कशी बसते. दम भरून श्वास घेते. पर्स उघडून केसांचा ब्रश काढते आणि भर वर्गात सफाईनं केस नीट करते.

वर्गातल्या इतर विद्यार्थ्यांच्या हालचालींपेक्षा वेगळं भासणारं हे दृश्य. मी तिकडे बघतो.

खांद्यापर्यंत बॉब केलेले तिचे मोकळे भुरे केस ब्रशमध्ये गुंतून हाताच्या हालचालीनुसार खालीवर मागे पुढे होतात. खांद्यावर रुबाबात पडतात. रुळतात. एखाद्या झुळझुळीत रेशमी साडीचा फॉल पायावर रुबाबात रुळावा तसे.

ती ब्रश पर्समध्ये टाकते. लिपस्टिक काढते आणि आरशाशिवाय सफाईनं ओठावरून फिरवते. ओठांची उघडझाप करून ती नीट पसरून घेते. लिपस्टिकही पर्समध्ये टाकते.

आणि मग पुढ्यातील काम भराभर संपवून एखाद्या रुबाबदार अधिकाऱ्याने कॅबिनमध्ये भेटायला आलेल्या लोकांवर त्रयस्थ पण वचक भरलेली नजर 'येस' म्हणून फिरवावी तशी आपली नजर ती क्लासभर फिरविते. कदाचित वर्षभर आपल्याबरोबर कोण शिकणार आहेत त्याचा आढावा घ्यायला.

ती नजर मलाही स्पर्शून जाते. मी वळून बघतो.

तिच्या सावळ्या रंगाशी जुळून येणारी तिची गडद तपकिरी बुबुळे तिच्या अर्धोन्मिलित भासणाऱ्या टपोऱ्या डोळ्यांच्या मध्यावर विसावल्यासारखी संथ असतात. तिच्या वयाच्या मुलीमध्ये प्राय: आढळणारी भिरभिर तिथं दिसत नाही. संथपणा असतो पण

समईचा नाही. खोलपणा पण डोहाच्या पाण्याचा नाही. एक प्रकारचा त्रयस्थ काचेरीपणा इंग्रजीत ज्याला 'प्लॅसिडिटी' म्हणतात तो.

तिची ही नजर–पुढच्या व्यक्तिच्या डोळ्यातून पार जाऊन पलिकडल्या भिंतीवर स्थिरावणारी एक–पारदर्शक नजर.

माझ्या मनात रुतून बसते.

मी साराला पहिल्यांदा पाहिलं ते असं.

हवा जरा गरमच होती. परस्पर परिचय करून घेण्याच्या गर्दीत पंखा सुरू करण्याचं भानही कुणाला राहिलं नव्हतं.

तीच उठली. बाजूच्या डेस्कवर ओणवी होऊन हात चांगला लांब केला आणि भिंतीवरचा रेग्युलेटर एकाच झटक्यात कडाक्दिशी पूर्ण फिरवला. त्या डेस्कशी बसलेला तिथला नवखा विद्यार्थी तिच्या ओणव्या अंगाखाली संकोचून पार शरमला.

कॉलेजमध्ये ॲडमिशन देताना प्रिन्सिपलनी विद्यार्थ्यांनी पाळायच्या शिस्तीबाबत काही सूचना देऊन ठेवल्या होत्या. त्यापैकी प्राध्यापक वर्गात आल्यानंतर सगळ्यांनी उठून उभे राहायचे ही एक होती.

म्हणूनच प्राध्यापक वर्गात आल्यावर सर्व वर्ग उठून उभा राहिला.

ती मात्र बसूनच होती.

विद्यार्थी बसत असताना पुढल्या विद्यार्थ्याला ती स्पष्टपणेच म्हणाली, 'व्हाय डिड यू स्टँड? इटस् ओल्ड फॅशन्ड.'

त्या वागण्यात आणि बोलण्यात गुर्मी होती की बेदरकारपणा होता कुणास ठाऊक!

मस्टरवरची नावं वाचता वाचता प्राध्यापक नेमके तिच्या नावावर अडले.

"सरन्...सरन् अल्वारीस?" त्यांनी वर बघितलं.

"इटस् सारा. एस–ए–आर–ए–एच. सारा अल्वारेस." शब्दा शब्दावर जोर देत तिनं अस्सल इंग्रजी उच्चारात उत्तर दिलं.

तो तिच्या बोलण्याचा ढंग थंड होता पण रेखीव होता. तिच्या काचेरी डोळ्यांना शोभेसा.

वर्ग संपल्यावर घरी जाताना मला दिसत होते ते तिचे तपकिरी डोळे. ती उणीपुरी उंची आणि कणाकणातून भरलेला तो त्रयस्थ थंडपणा – पॅसिव्हनेस....

मी प्रथम दुसऱ्या रांगेतील मधल्या डेस्कशी बसत असे पण त्या डेस्कवर दुपारच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यानं स्त्रीच्या प्राथमिक अवस्थेतलं त्याच्या कलागुणाला झेपेल एवढं एक वास्तववादी चित्र काढून ठेवलं होतं. त्या चित्रातल्या विषयापेक्षा तो 'इंप्रेशनिस्ट' चित्रकलेचा साक्षेपी प्रकार मला भलताच बोचला आणि तिथून उठून मागल्या रांगेतल्या डेस्कशी जाऊन बसलो आणि मग तिथंच स्थिरावलो.

सुरुवातीला शेजारच्या जागेवर कुणीही बसत असे. कुणी वर्गमित्र अजून झाला नव्हता त्यामुळे कुणी विशिष्ट

व्यक्तीनंच बसावं अशातलाही भाग नव्हता.

मी साधारणत: वर्ग सुरू व्हायच्या बराच अगोदरच येत असे. आणि इतर विद्यार्थ्यांबरोबरच्या गप्पात सामील होत असे. सारा बहुधा वर्ग सुरू व्हायच्या नेमक्या वेळी यायची.

एक दिवस माझ्या शेजारी कुणी बसलेलं नव्हतं. ती वर्गात आली आणि माझ्या शेजारच्या जागेवर येऊन बसली. आल्या आल्या तिनं आपली पर्स बेंचाच्या मध्यावर ठेवली.

त्या दिवशी सारा ज्या जागेवर बसली तीही वर्ष संपेपर्यंत तिथंच स्थिरावली.

वर्गात सर्व विद्यार्थी आपापली नोट-बुके घेऊन येत. लेक्चरच्या काळजीपूर्वक नोटस् काढीत. सारा वहीच काय पण कागदही आणीत नसे. आल्या आल्या ती मस्टरवर सही करून कुणाला तरी कागद मागे किंवा सरळ कुणाची वही ओढून त्यातून आपल्याला हवे तेवढे कागद फाडून घेई. त्याला काय वाटेल ह्याची तिला खंत नसे. एकदा असाच एका विद्यार्थ्याला तिनं कागद मागितला. त्याचं लक्ष नव्हतं. हिनं चक्क हात लांबवून त्याची वही ओढून घेतली त्यातले कागद फाडून घेतले आणि वही त्याच्याकडे फेकून दिली. त्याचा भांवा-वलेला चेहरा मला अजून आठवतो.

ती डाव्या हातानं लिहायची. लिहि-ण्याचा कागद डेस्कशी जवळ जवळ समांतर. नोटस् काढताना झरझर लिहायची आणि एखादं वाक्य सुटलंच तर शेजारच्या विद्यार्थ्यांची वही ओढून त्यातून ती जोडून घ्यायची; किंवा 'वुड यू रिपीट द लास्ट सेन्टेन्स प्लीज' म्हणून खमंगपणाने प्रोफेसरलाच विचा-रायची. आणि त्यालाच आपली मागली दोन वाक्ये जोडून घ्यायला भाग पाडायची.

हा तिचा प्रश्न नंतर एवढा नित्याचा झाला होता की तिला ओळखण्याची ती परवलीची खूणच झाली होती.

तिचा वर्गात प्रश्न विचारण्याचा ढंगही और होता. त्यामध्ये निश्चितपणा असायचा. आपल्या शंकेबद्दल खात्री असायची आणि नेमकं उत्तर काढून घेण्याची लकबही असायची. तिचे उच्चार नेटके आणि स्पष्ट होते आणि शब्दाची निवड नेमकी. बोलणं आग्रही असायचं आणि बोलण्यात काही शब्द आणि वाक्प्रयोग असे उत्स्फूर्त यायचे की जाणत्यानं दाद द्यावी. आणि अशी दाद तिनं अनेकदा घेतलीही होती.

तिचा बाकावर बसण्याचा प्रकारही तिच्यासारखाच वैशिष्ठ्यपूर्ण असायचा. स्वत:ला हवी तेवढी जागा ती नि:संकोच-पणे बळकावून घ्यायची. उरलेल्यात दुसऱ्यानं आपली सोय पहावी. त्यातूनही आपल्या शेजारी दोघांच्या मध्यावर ती आपली पर्स ठेवून देई. त्या लक्ष्मण-रेषेच्या पलीकडली जागा त्याची. त्यानं आपलं बघून घ्यावं.

तिची जागा तिची म्हणून निश्चित झाल्यानंतर तिथे दुसरं कुणी बसत नसे. आणि बसलाच तर ती दारात दिसताच उठून जाई. कुणी बसू का म्हणून

विचारलंच तर मी म्हणत असे, 'माझी हरकत नाही पण ती आल्यावर तुझं तू पहा.' त्यानंतर कुणी बसतच नसे.

एकदा तिनं त्या जागेवर ती का बसते हेही स्पष्ट करून टाकलं. त्या जागेच्या वर पंखा असल्यानं ती तिथं बसते हे तिचं आपण होऊन दिलेलं स्पष्टीकरण इतरांना कितपत पटलं कुणास ठाऊक !

आमच्या वर्गात विविध तऱ्हांचे आणि विविध विषयात पदवी घेतलेले विद्यार्थी होते. समाजाच्या सर्व स्तरांमधून आलेल्यांचं तिथं एक कॉस्मॉपॉलिटन संमेलनच झालं होतं. लवकरच त्यात समान आवडी निवडी असलेल्यांचे गट निर्माण झाले. भाषेचा नाही म्हटलं तरी एक अतूट धागा असतो. हा एकटा धागा भिन्न भाषियांच्या समूहामध्ये एक भाषियांना जवळ आणून बांधून ठेवतो. त्याच धाग्यानं आम्हा मराठी भाषीयांचाही एक गट लवकरच निर्माण केला.

अर्थात सुदैवानं गटबाजी कधीच झाली नाही. आम्ही सर्व प्रगल्भ होतो. प्राध्यापकापासून तर सरकारी नोकरीत आणि खाजगी कंपनीत अधिकारावर असलेले सर्व आम्ही असल्या क्षुद्र गोष्टींना फारसे महत्त्व देत नव्हतो. सर्व व्यवहार इंग्रजीतून होता. पण त्या इंग्रजी वातावरणातही आम्ही मराठीतून बोलत होतो.

कॉन्व्हेंटमध्येच ज्यांचं शिक्षण झालं आणि मातृभाषेएवढं इंग्रजी बोलभाषेवर ज्यांचं प्रभुत्व होतं अशांचाही एक गट होता.

वास्तविक ह्या गटात सारा जायला हरकत नव्हती. पण कुठल्याही गटात मोडणे हा तिचा स्वभावच नव्हता. तिचं आपलं स्वतःचं असं व्यक्तिमत्त्व होतं. त्याला गटाची बांधणूक पसंत पडणारी नव्हती. ती अबोल नव्हती पण सगळ्यांशी बोलत सुटणे हेही तिच्या स्वभावात नव्हते. निवडक लोकांशीच ती बोलायची—मग तो कुठल्याही गटाचा असो. फक्त तिच्या निवडीत बसणारा मात्र असायला हवा होता.

साराची आणि माझी ओळख तसं म्हटलं तर फार लवकरच झाली. माझ्या शेजारी बसायला लागण्यापूर्वीही काही निमित्तानं आम्ही बोललो होतो, कधी निमित्त काढून बोललो होतो. माझ्या शेजारी बसण्यामागचं म्हणून तिनं दिलेलं पंख्याचं कारण म्हणूनच पटणारं नव्हतं. तिच्या आगांतुक वात्रटपणाचा तो एक प्रकार होता हे न कळण्याइतपत मीही खुळा नव्हतो आणि इतरही खुळे नव्हते.

तिच्या मनस्वी स्वभावाला साजेलशाच अशा तिच्या कसोटया होत्या. तिच्या ह्या कसोटयांना मी कसा काय उतरलो कुणास ठाऊक, पण वर्गात आणि इतरत्रही ती माझा उल्लेख 'माय फ्रेंड' असा करायची आणि माझी एखादी कल्पना किंवा वाक्य चूक कसं आहे हे सांगताना शिष्टपणाचा आव आणून 'इटस् नॉट लाइक दॅट माय डिअर !' असं आगांतुक मतही द्यायची !

खरं म्हटलं म्हणजे आमच्यात कुठलंही साधर्म्य नव्हतं. ना संस्कृतीचं—ना भाषेचं

—ना आवडीनिवडीचं. मी मुळात राष्ट्रवादी विचारसरणीचा. आपला देश तो आपला देश. त्याला कुणी कुठल्याही बहाण्याखाली हिणविलेलं मला खपत नसे. माझी भाषा, माझी संस्कृती, आपला लोकशाहीचा प्रयोग ही माझी अभिमानाची स्थानं. सारानं ह्या भाषिक, राष्ट्रीय आणि सांस्कृतिक अभिमानाच्या फंदात पडण्याचे कारणच नव्हते. इथल्या स्थानिक ख्रिश्चन संस्कृतीत जन्मून वाढलेली ती. सुशिक्षित ख्रिश्चनांमध्ये आढळणारा ह्याबाबतीला एक त्रयस्थपणा तिच्या अगांगांत मुरलेला.

त्यातून तिची विचारसरणी वेगळी. स्वभावही वेगळा. तिच्या आक्रमक आणि आग्रही व्यक्तिमत्त्वाशी माझ्याही आग्रही व्यक्तिमत्त्वाचं कसं जुळावं? माझ्यासाठी तिनं आपल्या स्वभावाला मुरड घालावी आणि मीही तिचा स्वभाव चालवून घ्यावा ह्याला आवश्यक असलेलं कोणतंच प्रयोजन नव्हतं. मला ते कधी वाटलं नाही आणि तिला वाटावं ही अपेक्षाही करणं चूक होतं.

तिची एक गोष्ट मात्र मला आवडायची आणि ती म्हणजे तिचा निखळ प्रांजळपणा—एक सरळ रोखठोक वृत्ती. त्यात सभ्यतेच्या नावाखाली होणारी लपवाछपव नसे, किंवा कुणी काही म्हणणार तर नाही ना ह्या भितीपायी स्वतःचा कोंडमारा करून घेणे नसे. तरी ती स्वैर नव्हती आणि उद्धट तर नाहीच नाही. व्यक्तिशः वागताना तिचं वोलणं मृदु आणि आकर्षक असायचं. स्वतःबद्दल तिला विश्वास होता आणि स्वतःला कसं जपावं हेही ती चांगलं जाणत होती.

माझ्या शेजारी बसायला लागल्यावर चार-दोन दिवसानंतरचीच गोष्ट असेल. बसल्या बसल्या तिनं माझी फाईल ओढून त्यावर डाव्या हातानं काही खरडलं आणि ती फाईल माझ्याकडे सारली. तिनं लिहिलं होतं,

"आज मला लिफ्ट देशील का?"

मी चमकलोच. पुरी दोन दिवसांची ओळख नसताही त्या पोरीनं मला चक्क लिफ्ट मागितली होती!

वर्ग संपल्यावर तिला विचारलं,

"कुठं राहतेस तू?"

"वांद्र्याला."

"हे बघ मला लिफ्ट द्यायला हरकत नाही. एवी तेवी मीही तिकडेच रहातो. पण तुझ्यासारख्या मुलीनं अर्धा तास आणि तेही स्कूटरच्या मागल्या सीटवर......"

"घाबरतोस?"

मी चकितच झालो.

"प्रश्न माझ्या घाबरण्याचा नाही..."

"डोंट वरी अबाउट मी..."

त्या दिवशी मी तिला लिफ्ट दिली.

रस्त्यात ती काहीच बोलली नाही आणि मीही नाही. कॉलेजसंबंधी चार-दोन जुजबी प्रश्नोत्तरं झाली असतील तेवढीच.

त्यानंतर तिला अनेकदा लिफ्ट द्यावी लागली. मी वर्ग संपल्यावर कुणाशी बोलत असलो तर वर्गाबाहेर किंवा खाली जाऊन वाट पहात रहायची नाही तर 'चल ना लवकर' म्हणून




PRATIBHA-1510-6-MAR

तेथून ओरडायची.

तिचा एक मित्र होता. वर्ग संपल्यानंतर तिच्यासाठी तो वाट पहात उभा असायचा. तिच्या मर्जीत असलं तर ती त्याच्याबरोबर जायची नाहीतर त्याच्या समोरच चक्क माझ्या स्कूटरच्या पाठीमागल्या सीटवर जाऊन बसायची.

एकदा तो असाच वाट बघत असताना कुर्‍यात मला म्हणाली,

"मला लिफ्ट देतोस ना ?"

तिच्या बोलण्याचा रोख माझ्या लक्षात आला. त्याच्या दुखावल्या चेहऱ्याकडे बघत म्हणालो,

"व्हॉटस् स्पेशल आवाउट इट टुडे ?"

"द्यायची की नाही ?" एकदम आक्रमक होऊन फिस्कारत ती म्हणाली.

त्याच्या लक्षात ते येताच आपण होऊन तो मला म्हणाला,

'इटस् ऑल राईट. नथिंगस् रॉंग देअर."

"ठीक आहे" खांदे उडवून मी म्हणालो.

तिला मागे बसवून त्याच्यासमोर गाडी गेअरमध्ये टाकून सर्रदिशी वळवून रस्त्यावर घेताना मला बरं वाटलं नाही.

ती बोलत नव्हती. त्यांचं काही बिनसलं असावं हे स्पष्टच होतं आणि त्याच्या मत्सराला आव्हान देण्यासाठी हे सारं तिनं केलं होतं हेही न कळण्याइतपत मी अडाणी नव्हतो.

काही वेळ गेल्यानंतर मीच म्हणालो,

"तू त्याच्यावरोबर का गेली नाहीस ?"

"तुझ्याबरोबर आले तर काय बिघडलं रे ?"

"निश्चित बिघडलंय्..."

"घाबरलास त्याला..."

"डॅम इट ! टॉक सेन्स !" मी तडकून म्हणालो.

त्यानंतर ती बोललीच नाही. तिच्या नेहमीच्या ठिकाणी उतरल्यावर ती म्हणाली,

"ॲम आय हॅंगिंग ऑन यू उत्तरवार ?"

"नो."

ती हसली. तेच काचेरी हास्य आणि जणू काही झालंच नाही अशा वृत्तीनं ती चालूही लागली.

तिचा स्वतःवरील विश्वास आणि त्यातून निर्माण झालेला बेडरपणा वर्गात अनेकदा व्यक्त व्हायचा. हा विश्वास कधी ढळल्याचं आढळलं नाही. शब्दांच्या कोंडीत सापडल्यावर ती स्वतःची सफाईनं सुटका करून घ्यायची. नाहीतर फिस्कारून इतरांना 'ओव्हरपॉवर' करायची. त्यावेळी व्यक्त होणारी तिची धडाडी ? ओह...

जर्नॅलिझमच्या विद्यार्थ्यांनी सतत लिहावं अशी कॉलेजची रास्त अपेक्षा होती. कॉलेजचं स्वतःचं पाक्षिक होतं. आम्हीच निरनिराळ्या विषयावर लेख लिहायचे आणि आम्हीच ते संपादित करायचं. मुली—एक दोन अपवाद सोडले तर—अभावानंच लिहायच्या.

वर्गात एकदा आमचे संबंधित प्राध्यापक मजकूर बरेच रुष्ट झाले होते. वृत्तपत्रविद्या शिकायची आणि वृत्तपत्र-

लेखन करायचं नाही म्हणजे शिकण्याचा उपयोग काय...वगैरे बरंच. बहुतेक मुली अपराध्यासारख्या चूप बसल्या होत्या. तंगपणा निर्माण झाला होता. कुणीतरी बोलून तो सैल करायला हवा होता. प्राध्यापक म्हणत होते, हा सगळा उपक्रम आपण सगळ्यांनी मिळून चालवायचा आहे. प्रत्येकानं त्यात भाग घ्यायला हवा. प्रत्येकजण कार्यशील हवा—भागीदार हवा.

आणि साराला संधी मिळाली. ती बोलली. सर्व मुलांच्यावतीनं.

"वेल्.. वुई आर स्लीपिंग पार्टनर्स !"

क्षणभर काहीच झालं नाही.

पण मला हसू आवरलं नाही. मी खस्सन् हसून गेलो.

आणि मग त्या तंग वातावरणात बाँबच पडला. माझ्या त्या हसण्यानं तिच्या बोलण्याला भलताच अर्थ आला आणि सारा वर्ग बांध फुटल्यासारखा खो खो हसायला लागला. अगदी प्रोफेसरसुद्धा !

जबाबदार मी होतो. प्रत्यक्ष काही काम न करता ज्या भागीदाराला व्यापाराचे फायदे मिळतात त्याला स्लीपिंग पार्टनर म्हणतात. सारा त्याच अर्थानं म्हणाली होती. आणि सगळ्यांनी तिचं वाक्य त्याच अर्थानं घेतलं होतं. माझ्या नुसत्या हसण्यानं मात्र त्याला भलताच अर्थ प्राप्त झाला होता.

मला वाटलं एरवी गुर्मीत असणारी सारा आता संपली. डोळ्यांच्या कोपऱ्यातून शेजारी बसलेल्या तिच्याकडे बघितलं.

पण ती कसली वस्ताद. सगळ्या क्लासच्या हसण्याच्या आवाजावर आवाज चढवून ती सटकन् म्हणाली,

"डोंट गिगल् इन अँटिसिपेशन ऑफ 'अॅन इम्पॉसिबल !"

बस्स ! हम तो मान गये !

एखादी मुलगी शरमेनं संपूनच गेली असती. पण लवकर संपणं हा साराचा स्वभाव नव्हता. तिचा पिंडच नव्हता.

कारण तिच्या स्वभावात जिद्द होती. एक ठायी ठायी मुरलेली जिद्द. हट्टीपणापेक्षा आव्हानाला तोंड देण्याची जिद्द.

हीच जिद्द तिच्या आयुष्यात होती. तिच्या आयुष्याच्या सगळ्या पैलूंना छेद देऊन गेली होती. स्वभावाचा गुणधर्म होऊन बसली होती.

सकाळी नऊपासून संध्याकाळी साडेपाचपर्यंत काम करून पुन्हा उपनगरातून मुंबईला संध्याकाळच्या साडेसहाच्या कॉलेजला ती यायची. ह्या धावपळीत कित्येकदा प्रसाधनही करायला न मिळाल्याने वर्गात आल्यानंतर तिनं एकदा तो साधा कार्यक्रम केसांवरून ब्रश फिरवून आटोपून घेतला होता. हे कारण कळल्यावर मला तिची कणव आली.

वर्गातल्या काही मुली हौस म्हणून आल्या होत्या. घरून निघायच्या अगोदरच आपलं प्रसाधन त्या काळजीपूर्वक करायच्या. घरची सुबत्ता आणि आधुनिक सुखवस्तूपणा त्यांच्या रोजच्या बदलत्या कपड्यांवरून, हेअर स्टाईल्स-

वरून आणि रोजच्या बदलत्या सेंटस्च्या वासांवरून प्रतीत व्हायचा. ह्या गुळगुळीत बाहुल्यांमध्ये सारा बसत नव्हती. ऑफिसात काम करणाऱ्या मुलींमध्ये संध्याकाळी हटकून येणारा थकवा तिच्या मुद्रेवर प्रतीत व्हायचा. आपल्या स्वाधीन नसलेल्या बाह्य शक्तीबरोबर दोन हात करताना आलेले यश अपयश पचविताना स्वभावात आलेला कडूगोडपणा आणि भोवतालच्या चेहरा नसलेल्या गर्दीतही आपलं अस्तित्व वेगळेपणानं जपायची धडपड हे सारं तिच्या वागण्यातून प्रतीत व्हायच.

सारा इतर मुलींप्रमाणे ह्या प्रचंड प्रवाहावरोवर असहाय्यपणे वहात नव्हती. आपली सारी जिद्द आणि शक्ती पणाला लावून त्या प्रवाहात स्वत:ची जपणूक करीत, आव्हान स्वीकारून एकांडेपणानं पोहत होती.

तिचं व्यक्तीत्व म्हणूनच आक्रमक होतं, आग्रही होतं आणि प्रसंगी विक्षिप्त होतं.

तसं पाहिलं तर निसर्गानं भरपूर उंची आणि शरीरसौष्ठव दिलं होत. किंचित जडपणाकडे झुकली तरी त्यात प्रमाणबद्धता होती. नाकी डोळी एक नीटस रेखीवपणा होता. ओठ तर एखाद्या शिल्पासारखे रेखीव होते. बुद्धी होती, संभाषण चातुर्य होतं आणि भाषेवर पकड होती.

व्यक्तीश: ती मृदु होती हे खरं पण तिच्या व्यक्तीगत अहंकाराला कुणी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आव्हान दिलं की ती वाघीण व्हायची. मग तिच्या बोलण्यानं आणि वागण्यानं कुणी ओरबाडून रक्ताळला तरी त्याची तिला पर्वा नसे. वार करायचा तो ती किरण साधून करायची. एका फटक्यात प्रतिपक्ष जायबंदी होऊन कोसळेल एवढ्या सज्जडपणे.

तिला आपण वर्कींग गर्ल आहोत ह्याचा फार अभिमान होता. कॉन्व्हेंटमध्ये अध्यापन करताना आपल्याला वेगळं काही तरी करायला हवं ह्या विचारानं ती भारली गेली आणि ॲडव्हरटाईजिंगचा डिप्लोमा पूर्ण करून इंटरव्ह्यूमध्ये इतर बऱ्याच पुरुषांना मागे सारून ती एका लिमिटेड कंपनीच्या जाहिरात विभागात अधिकारी म्हणून लागली.

केवळ शिक्षण घेतल्यामुळं त्या विषयातलं सगळं आलं असा तिचा समज कधीच नव्हता. प्रत्यक्षात काम करायचं म्हणजे श्रम लागतात, चिकाटी लागते. त्यातून जाहिरात विभागाचं काम बरंच कष्टाचं. अनेकांशी संबंध येतात. नवीन जोडावे लागतात. जोडलेले कायम ठेवावे लागतात. जीवघेण्या व्यापारी स्पर्धेत सतत जागरूक राहून कंपनीचं नाव टिकवून ठेवावं लागतं. त्यासाठी अनेक पथ्ये पाळावी लागतात, नीती अनितीचा बाउ करून चालत नाही. सतत अवधान ठेवावं लागतं आणि क्षणोक्षणी स्वभावाला मुरड घालावी लागते.

सारा हे सारं करीत होती. तिची निवड झाल्यावर हे काम पुरुषाचं आहे. बघू ही बाई काय उजेड पाडते ती ' असे कुत्सित उद्गार काहींनी

काढले होते. ते खोटे ठरवायला ती श्रमत होती, धडपडत होती. जिवाचं रान करीत होती.

कधी कधी संध्याकाळी कॉलेजात आली की ती पार थकलेली असायची. अशावेळी ती म्हणे,

" आय अॅम फेड अप ऑफ लाईफ उत्तरवार. '

मला ते कळायचं पण तिचं बोलणं हसण्यावारी नेऊन मी म्हणायचा. ' आयुष्य एवढं वाईट नाही '

" डोंट बी अनरिझनेबल. "

एकदा मी असाच म्हणालो असता ती उसळली. म्हणाली," तुला काय होतं तसं म्हणायला. आळश्यासारखं मनास येईल तेव्हा काम करणारे सरकारी नोकर तुम्ही. खाजगी कंपन्यांमध्ये कसं पिळून घेतात हे काय माहित. दे मेक यू वर्क वर्क अँड वर्क टिल् लास्ट ड्रॉप ऑफ युवर ब्लड इज सॅप्ड ! "

" पण ते पगारही तसाच देतात "

" ब्लास्ट इट ! शक्ती कुणात उरते तो पैसा वापरण्याची. "

मग उसासा टाकून म्हणाली,

" जाना दो साला तकदीरकी बात है ! "

रोज नवनवीन फॅशनचे कपडे घालून येणाऱ्या बाप्रल्यांसारख्या दिसणाऱ्या मुलीबाबत एकदा ती म्हणाली,

" ह्या पुढल्या जीवनात कसं करतील रे ? "

" म्हणजे ? "

" नुसत्या सुखाची सवय झालेल्या ह्या मुली प्रत्यक्ष जीवनात लग्नानंतर उतरल्या तर आयुष्याच्या निष्ठुर वस्तुस्थितीपुढे कशा टिकतील त्या ? "

" वस्तुस्थितीची चिंता आपल्यासारख्याला सारा. त्यांना पुढल्या जीवनात मिळायचं ते मिळतच राहील. त्या करतील तेच मुळी सर्व विचारांती. सुखी जीवनासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी ज्याच्याजवळ आहेत त्यालाच त्या आपला जोडीदार म्हणून निवडतील. लग्न म्हणजे एक आवश्यक असा सरळ


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यांपासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी** (S. N.) पो. कतरी सराय (गया)

व्यवहार आहे त्यांच्या दृष्टीनं."

"पण जोडीदार चांगल्या स्वभावाचा नाही निघाला म्हणजे? किंवा स्वभावच मुळी भिन्न निघाले म्हणजे तडजोड व्हायची कशी? ह्या लाडावलेल्या..."

"सारी तडजोड होते. तेवढं व्यवहार चातुर्य असतं त्यांच्याजवळ. कार, फ्रीज़, एअरकंडिशनर, स्टिरिओ असला की बाकीचं सगळं अॅडजस्ट होतं."

"मला नाही पटत. आपलं स्वतःचं असं काही व्यक्तित्व असतं की नाही? ह्या सगळ्या गोष्टींच्याखाली ते गाडलं जाऊ शकतं असं म्हणायचंय् तुला?"

मी हसलो. म्हणालो,

"तू स्वतःला रिअॅलिस्ट म्हणवतेस ना? मग व्यक्तिमत्वाचे एवढे लाड?"

ती अभावितपणे पकडली गेली होती. फिस्कारून म्हणाली

"डॅम इट! आय अॅम गोईंग मॉरबिड. विषय बदल!"

विषय अर्थातच बदलला.

जीवनाशी ती अशी जिद्दीनं झगडत होती. पण मूडमध्ये असली की तिचं बोलणं मार्मिक असायचं. मृदु नर्मविनोद तिच्या बोलण्यातून क्षणाक्षणाला डोकवायचा.

आपण होऊन ती फारशी कुणात मिसळत नसे आणि आगंतुकपणे तिच्या निकट येण्याचा प्रयत्न केला तर ती त्याला मोठ्या गमतीने झुरळाला टिचकिनं उडवावं तसा उडवून लावी

एक विद्यार्थी असाच तिच्याशी बोलण्याच्या प्रयत्नात तिला खुलवावं म्हणून म्हणाला,

"तुझ्या वर्गातल्या नोटस् फार छान असतात सारा."

तिनं त्याच्याकडे प्रथम व्यवस्थित बघून घेतलं. मानेची आणि भुवयांची मजेदार हालचाल केली. मग झक्कपैकी पवित्रा घेऊन डेस्कवर बसली. आपल्या पर्समधले दोनचार अस्ताव्यस्त दिसणारे कागद काढले आणि त्याच्याकडे बघत म्हणाली,

"हिअर! ह्यातल्या नोटस् तू टाईप कर. पहिली कॉपी मला दे. दुसरी तू ठेव...अं?"

आपल्या गालावर उजवी तर्जनी रोवून मान कलती करून त्याच्याकडे मिस्किलपणे बघत ती म्हणाली.

त्यानं ते कागद बघितले. त्याच्यावरचं अर्धमुर्ध काहीतरी लिहिलेलं बघितलं...

पुन्हा त्यानं तिच्या नोटस्बद्दल चकार शब्द काढला नाही.

ती खुशीत असली म्हणजे खास मुंबई स्टाइलच्या हिंदीत बोलायची. फक्कडपैकी पुरुषी धाटणीचा विनोद करायची आणि वरून "क्या साला जोक मारा!" असं म्हणन खिदळायची.

माझा नेहमीचा मार्ग पेडर रोड, महालक्ष्मी, हॉर्नबी वेलार्ड, कॅडेल रोड असा असायचा. महालक्ष्मी चौक मागे टाकून हॉर्नबी वेलार्डन भरधाव निघालो की समुद्रावरून येणारा गार वारा अंगाला लागायचा आणि सारा शीण जाऊन मन प्रसन्न वाटायचं. अशावेळी सारा मूडमध्ये असली को स्वतःशी गुणगुणायची.

तिच्या आवाजाला गोडवा होता. गुणगुणणंही मोठं वेधक. कुठली तरी स्पॅनिश ट्यून असे. मला फार आवडायची. अर्थात तसं सांगण्याची सोय नव्हती. सांगितलंच तर रेकॉर्डवरून स्टायलस घसरताना येतो तसा खर्रर्र असा बद्तमीज आवाज घश्यातून काढून आणि 'सत्यानास' असं ओरडून ब्रेक लागल्यासारखं गाणं बंद करून टाकायची! त्याचा अर्थ काय होता कुणास ठाऊक.

वात्रटपणा असेल, विक्षिप्तपणा असेल किंवा कदाचित स्वतःच्या विश्वात गेल्यावर कुणी चाळवलं तर त्याबद्दलची नापसंती व्यक्त करण्याची तिची ती खास तऱ्हा असेल. अर्थात् हे माझे अंदाज. खरं तिलाच ठाऊक.

मध्ये काही दिवस ती वर्गात आलीच नाही. वर्गात न यायला तिला फारसं कारण हवं होतं असंही नाही. तिची मर्जी नसली की सरळ दांडी मारत असे. त्यामुळंच ती दिसली नाही म्हणून मी चौकशीही केली नाही.

सात आठ दिवसानंतर ती एकदम उगवली. अगदी थकल्यासारखी दिसत होती.

माझी बाईक मी सर्व्हिसिंगला टाकल्यामुळे बसनंच येत जात होतो. वर्ग संपल्यानंतर बस स्टॉपवर जायला निघालो. तीही सोबत आली. त्या दिवशी बस लवकर आली नाही. आम्ही कंटाळून गेलो. तिचा त्या दिवशी बोलण्याचा मूडच नव्हता. आजारामुळं माणूस अंतर्मुख होतो. तशीच ती त्या दिवशी होती. न बोलता एकमेकांकडे पहात आणि चमत्कारिकपणे हसत आम्ही उभे होतो. बस आलीच नाही. ती अखेर कंटाळून म्हणाली.

"गेले पाच सहा दिवस ताप होता. आज खूप थकल्यासारखं वाटतं रे."

"मग मला अगोदर सांगायला नको होतं?"

मी उद्गारलो.

"तुला कळायला नको होतं?"

मी टॅक्सी थांबवली. दार उघडून तिला म्हणालो,

"चल तुला घरी सोडतो."

सुटकेचा निश्वास टाकीत ती म्हणाली,

"तुझी आभारी आहे फार."

टॅक्सी भराभर अंतर कापीत होती. एरवी भोवतालचं दृश्य पाहून उत्तेजित होणारी, ठिकठिकाणी तेजाळणाऱ्या निऑन साईन्स बघून आपल्या कंपनीची निऑन साईन कुठल्या स्पॉटवर टाकावी ह्याचा उत्साहानं विचार करणारी ती ह्या सर्व पसाऱ्यातून मुक्त झाल्यासारखी आपल्या स्वतःत हरवून बसली होती.

समुद्राचा गार वारा लागला तशी ती चाळवली. डोळे उघडून एकटक बाहेर बघत राहिली. ती शांतता मला असह्य झाली. म्हणालो,

"आज चूप आहेस?"

"आय ॲम फेड अप ऑफ लाईफ!"

"चल्. हे तुझं नेहमीचंच आहे. आयुष्याला कंटाळली असतीस तर एवढ्या जिद्दीनं त्याच्याशी लढत राहिली नसतीस."

तिनं सुस्कारा सोडला. स्वेटर नीट

अंगाला गुंडाळून घेतलं आणि म्हणाली,

"माणूस मरत नाही म्हणून जगतो. जगायला हवं म्हणून कष्ट करतो आणि कष्ट करतो म्हणून आयुष्यात गुंतत जातो. मरत नाही. ए ग्रेट ब्लडी होक्स !"

मी क्षणभर थांबलो. मग म्हणालो,

"तू एखादा छानसा मित्र का शोधीत नाहीस सारा. एक बॉय फ्रेंड. त्याच्या मैत्रीत तुला विरंगुळा मिळेल. तुझ्या मनाला सोबत होईल. वाटून घेतल्यानं दुःख हलकं होतं आणि सुख वाढतं."

"स्टॉप इट ! असल्या तत्त्वज्ञानानं आयुष्याचे मार्ग सापडत नाहीत."

"तेही सापडतील."

"डोंट इट अप माय हेड. तुझा उपदेश नकोय् मला." ती एकदम फिस्कारून म्हणाली.

मी तिच्या भल्यासाठी सांगत होतो. एरवी तिच्या जीवनाशी मला काय कर्तव्य होतं. एक कणव होती पण ह्या तिच्या आगाऊपणामुळे मला क्षणभर तीही संपल्यासारखी वाटली. चिडूनच ओरडलो,

"देन ब्लास्ट युवरसेल्फ !"

त्यावर ती काहीच बोलली नाही. मग मागल्या सीटवर डोकं टेकून थकल्या आवाजात म्हणाली,

"डोंट पुल दॅट हार्ड उत्तरवार ! इट हर्टस्."

काही वेळ तसाच गेला मग डोळे मिटल्या मिटल्या म्हणाली,

"तुला माहीत आहे मी लग्न का करीत नाही ते ? मला भिती वाटते तो मला बदडेल. ही विल् बीट मी टिल् आय ब्लीड टू डेथ !"

तिनं मान फेकली आणि हसायला लागली. पहिल्यांदा खळखळून मग अगदी विकृत आवाज येईपर्यंत ! मी थक्कच झालो.

"मला बॉय फ्रेंड नको. लग्न नको. आय अ‍ॅम ऑल राईट ऑन माय झोन... समजलास ? ल-ल-ल-ला. ला..."

तिच्या नेहमीच्या जागी तिला सोडल्यावर मागं वळूनही न बघता ती म्हणाली,

"ओ. के. फ्रॉम हिअर आय गेट लॉस्ट !" आणि चालायलाही लागली.

पहिल्या टर्मच्या शेवटी झालेल्या सेमेस्टर परीक्षेला ती बसली नाही. काही तरी निमित्ये सांगितली. गंमत अशी की, दुसऱ्या टर्मला पुन्हा वर्गात यायलाही लागली. मी तिला त्याबाबत छेडलं तर म्हणाली, "परीक्षेला बसलंच पाहिजे असं बंधन आहे का?" ती असल्या तसल्या बंधनाच्या पार होती. शी वॉज ऑन हर ओन एनीवें !

दुसऱ्या टर्मला नियमित नव्हतीच. कधीतरी धूमकेतूसारखी यायची आणि मधूनच निघून जायची. ती वार्षिक परीक्षेला बसणार नाही हेही स्पष्टच होतं.

एवढ्यात तिचा मित्र क्लास संपेपर्यंत बाहेर उभा रहायचा. एकदा 'चल माझ्याबरोबर' असं म्हणून जवळपास ओढतच तिनं मला वर्गाच्या बाहेर काढलं. आपल्या मित्राशी ओळख करून

दिली. मला माझी स्वतःची अपॉइंटमेंट होती. पण त्या दोघांनीही मी त्यांच्याबरोबर कॉफी घेतलीच पाहिजे असा खूप आग्रह केला. दोघं दोन्हीकडून झाले आणि मला त्यांच्याबरोबर जाण्यावाचून गत्यंतर उरलं नाही.

ती खुशीत होती. चावट जोक्स करीत होती आणि 'क्या जोक मारा ! हसो.' असं ठणकावीतही होती. तिचा मित्र मला म्हणाला,

"हिला कसं काय चालवून घेतोस तू ?"

"म्हणजे ?"

"हा हिचा खडखडाट ?"

मी हसून म्हणालो,

"बघ हिला चालवून घेण्याइतपत हिच्यात गुंतलो नाही मी. आता खडखडाटाबद्दल म्हणशील तर रस्त्यानं चालताना ड्रिलिंग मशीनचा खडखडाट ऐकू आला तर त्या मशीनवर आपण धावून जात नाही. ती आपलं काम करीत रहाते आणि आपण पुढं निघून जातो."

तो खूप खळखळून हसला. हातावर टाळी देत म्हणाला, "तुझी ड्रिलिंग मशीनचा कल्पना आवडली मला."

सारा खुशीत होती म्हणून बरं !

मला तिचा मित्र आवडला. त्याचा खेळाडूपणा, त्याची समजूतदार वृत्ती, पर्सनॅलिटीही देखणी.

दुसऱ्या दिवशी मी तिला तसं सांगितलं. ती एकदम आनंदली. उत्साहानं म्हणाली,

"खरंच ? क्यूट आहे, नाही तो ?"


"हं !"

"तुला म्हणून सांगते. आम्ही लग्न करणार आहोत"

"खरं ?" मी आनंदून म्हणालो.




आंब्या आंब्यावर लिहीलेले असते चोखणाराचे नांव !




परंतू आंब्याच्या उत्तम लोणच्यावर लिहीलेले असते फक्त ठाकूरांचेच नांव !!

ठाकूर लोणची, पापड, मसाले, चटण्या.
माहीम मुंबई.

" तुझं वैवाहिक जीवन आनंदाचं होवो सारा. अगदी मनापासून म्हणतोय् मी. "

" मला त्याची खात्री आहे रे. "

" एक सांगू तुला ? ' तुझा आगांतुक उपदेश नको ' असं म्हणणार नसशील तर सांगतो."

ती प्रसन्नपणे हसली. ओठांची मजे-दार हालचाल करीत म्हणाली, " नाही म्हणत सांग. "

" वैवाहिक जीवनात फार तडजोडी कराव्या लागतात. तू स्वतःच्या मनाचे फार लाड करून घेऊ नकोस..."

" यू लिटल् फिलॉसफर ! " मध्येच मला तोडून ती म्हणाली,

" नाही तर तो मला बदडेल असं म्हणायचं ना तुला ? आय ॲम गोईंग टु टेक ए ट्रायला एनीवे ! "

" आय विश यू सक्सेस ! "

" थँक्स उत्तरवार ! "

गेल्या संपूर्ण कालावधीच्या ओळखी-मध्ये पहिलाच ' थँक्स ' तिच्या तोंडून ऐकला !

कॉलेज संपलं. तिची भेटही संपली. तिचा मित्र बंगाली हाता. तिचा हा मिश्र विवाह झाला की नाही. तिचं कसं काय चाललं आहे. आता तरी तिला जीवनात अर्थ आला असं वाटतं की नाही. काही कळलं नाही. तिचा फोन नंबर जवळ आहे पण फोन करायची इच्छा नाही.

एखाद्या धूमकेतूसारखी ती आली आणि तशीच गेली. ह्या कालावधीतल्या तिच्या ओळखीला काय नाव द्यावं ? मैत्री ? अहं ! नुसती ओळख...नाही. कळत नाही.

तिच्या मित्राबरोबर कॉफी घ्यायला गेलो असता तिचं वर्णन करताना तो " शी इज अॅन इम्पॉसिबल गर्ल " असं म्हणाला होता.

बस्स ! तेच वर्णन तिला चपखल बसतं..

ॲन इम्पॉसिबल गर्ल ! एक दुर्धर मुलगी ! ◻ ◻ ◻






# पुरुष-विशेष

श्री. मा. भावे

पुण्यातील नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चोक्सी यांनी एल्फिन्स्टनचे हे चरित्र लिहिले आहे. मराठी राज्याची अखेर आणि ब्रिटिश सत्तेची सुरुवात यांच्या संधिकालाचा डॉ. चोक्सींनी खूपच अभ्यास केला असून त्यावर दहा-बारा तरी पुस्तके लिहून प्रसिद्ध केली आहेत. दुर्दैवाने ही पुस्तके केवळ इंग्रजी आधारांचा वापर करून लिहिलेली असल्याने बरीचशी एकतर्फी झाली आहेत. तथापी ती वाचनीय आणि माहितीपूर्ण आहेत.

डॉ. चोक्सींना १९६६ साली ब्रिटिश कौन्सिलची कॉमनवेल्थ शिष्यवृत्ति एल्फिन्स्टनच्या जीवनाचा अभ्यास करण्यासाठी मिळाली. लंडन येथील इंडिया ऑफिस ग्रंथालयात १६ पेटया भरून एल्फिन्स्टनचे कागदपत्र आहेत. त्यात एल्फिन्स्टनच्या रोजनिश्याही आहेत. या कागदपत्रांवर प्रस्तुत चरित्राची उभारणी झाली आहे. खुद्द लेखकानेच प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे बहुतेक चरित्र एल्फिन्स्टनच्या स्वत:च्या शब्दातच रंगविले आहे.

एलफिन्स्टनच्याच शब्दात त्याचे चरित्र सांगण्याचा आग्रह धरल्याने काही तोटे झाले आहेत. पहिले म्हणजे चरित्र एकतर्फी झाले आहे. बाजीराव, त्र्यंबकजी डेंगळे, बाजीरावाचे मंत्री यांच्याविषयी एल्फिन्स्टनची मते व प्रतिक्रिया आपणास वाचावयास मिळतात पण त्याच घटनांबद्दलची मराठी बाजू या पुस्तकातून कळत नाही. दुसरे, ज्या गोष्टींविषयी एल्फिन्स्टनच्या कागदपत्रात उल्लेख नाही त्या हकीकतींचा स्पष्ट उलगडा या चरित्रांतून होत नाही. उदाहरणार्थ, यशवंतराव होळकराने पुण्यावर स्वारी केली तेव्हा एल्फिन्स्टन पुण्यात होता. पण त्याच्या रोजनिशीतील या घटनेविषयीचा भाग गहाळ झाला आहे. त्यामुळे यशवंतरावांची स्वारी ही महत्वाची गोष्ट

फारच त्रोटकपणे सांगितली जाते. तिसरे असे की गुप्त वाटाघाटी व कारस्थाने याविषयी आपल्या दैनंदिनीत काही लिहावयाचे नाही असा एल्फिन्स्टनचा शिरस्ता होता. राज्यक्रांतीच्या इतिहासातील खरा रंगतदार भाग गुप्त कारस्थानांचाच असतो व अशी कारस्थाने उपलब्ध पुराव्याच्या आधाराने आणि आपल्या प्रतिमेच्या सहाय्याने जिवंत करण्यात इतिहासकाराचा कस लागत असतो. परंतु असा प्रयत्नच डॉ. चोक्सींनी केलेला नाही.

एल्फिन्स्टनच्या कागदपत्रांना चिकटूनच चरित्र लिहिण्याच्या धोरणामुळे वर सांगितलेले तोटे झाले असले तरी एक अतिशय महत्त्वाचा फायदाही झाला आहे. अनेकदा वापरल्याने जवळपास निरर्थक झालेल्या शब्दात सांगायचे तर 'इतिहास जिवंत झाला आहे.' इतिहास जिवंत होतो म्हणजे काय होते ? व्यक्ती आणि घटना परस्परांना आकार देताना आपल्याला आढळतात. उदाहरणार्थ, बाजीराव पुण्यातून गेल्यावर एल्फिन्स्टन १७–३–१८१८ रोजी शनिवारवाड्यात रहाण्यास गेला. ही एक क्रांतिकारक घटना होती. तिचा एल्फिन्स्टनवर काय परिणाम झाला ? तो म्हणतो, 'हिंदू राज्य नाहीसे झाल्याने निर्माण झालेल्या रितेपणाचा सगळ्यावर परिणाम होत आहे. या वाड्याविषयी आम्हास वाटणारा आदर उरला नाही, त्यामुळे उदास वाटत आहे. आम्हाला उदास वाटते तर एतद्देशीयांना किती उदास वाटत असेल ?' एल्फिन्स्टनच्या मनात ही जी सहानुभूती निर्माण झाली तिचा कळत-नकळत परिणाम पुढील राज्यघटनेवर झाला हे निर्विवाद आहे.

दैनंदिन जीवनातील बहुसंख्य हालचाली, घडामोडी, सुखदुःखे क्षणभंगुर असतात. त्यांना इतिहासात स्थान मिळतेच असे नाही. कारण ज्या घडामोडींचा काळावर परिणाम झाला अशांचेच संकलन इतिहास करतो. इतिहास जिवंत होणार असेल तर त्यात या क्षणिक गोष्टींचाही समावेश झाला पाहिजे. उदाहरणार्थ गंगाधरशास्त्र्याच्या खुनाच्या बातमीने पुण्यात घबराट पसरली. ही घबराट इतिहासात स्थान मिळवीलच असे नाही. पण तिचे एल्फिन्स्टनने केलेले वर्णन आपणाला या पुस्तकात वाचावयास मिळते. 'पुण्यात खुनाविषयी मोठ्याने बोलण्याची चोरी झाली होती. गायकवाडांच्या गोटावर लोकांनी बहिष्कारच टाकला होता. गोटातील मंडळींचे नातेवाईकही त्यांच्याकडे चोरून येत होते.'

काही गोष्टींना त्यांच्या क्षणभंगुरतेमुळे इतिहासात स्थान नसते तर इतर काही नित्य असल्याने इतिहासात त्यांचा आढळ होत नाही, डोंगर दऱ्या, ग्रहतारे, उष्णता व थंडी या नित्याच्या गोष्टी आहेत. घटनांवर त्यांचा परिणाम होत असतोच. पण इतिहासाचे संकलन करताना हा परिणाम नेहमीच गृहीत धरला गेल्याने त्यांचा उल्लेख सहसा होत नाही. एल्फिन्स्टन हा निसर्गप्रेमी होता. त्याने आपल्या रोजनिशीत ठिकठिकाणी भूप्रदेश, हवामान, पशुपक्षी

यांची वर्णने लिहिली आहेत. त्यातील अनेक उतारे या पुस्तकात घेतले आहेत.

पण या सर्वांपेक्षाही महत्त्वाचे असे एक सातत्य इतिहासात कायम अनुल्लेखित असते आणि ते म्हणजे सामान्य मनुष्याचे. सामान्य माणसाची जीवनपद्धती तो ज्या काळात वा ज्या समाजात वावरतो त्यानुसार बदलत असेल. पण त्याचा स्वार्थ, त्याचे औदार्य आणि त्याच्या चारित्र्याचे मान सतत तेच असते. एल्फिन्स्टनच्या दैनंदिनीत, विशेषत: तो दक्षिणेचा कारभारी झाल्यानंतर त्याने जी राज्याची घडी बसविली त्याविषयींच्या कागदपत्रात काय जाणवत असेल तर ती या सामान्य माणसाची उपस्थिती. तो न्याय व्यावस्थेचा विचार करीत असो, जमीन महसुलाची नवीन पद्धती बसवीत असो अगर शिक्षणाची व्यवस्था लावीत असो. सामान्य माणसाचे पूर्वग्रह व त्याच्या समजुती यांची जाणीव त्याला आहे. या पुस्तकात सामान्य माणसाची मूक उपस्थिती सतत आहे.

एल्फिन्स्टनच्या चरित्रात इतिहास असा चहू अंगांनी जिवंत झाला आहे.

प्रस्तुत पुस्तकातून मिळणारी किरकोळ माहितीही अतिशय मनोरंजक आहे. तीबद्दल अधिक चौकशी करून साद्यंत हकीकती दिल्या असत्या तर पुस्तकाला अधिक रंग आला असता. उदाहरणार्थ, मराठी राज्य घेतल्यानंतर फितुरांना बक्षिसे वाटण्यात आली त्याची माहिती. इंग्रज राज्यावर आल्यावर त्यांना फितूर झालेल्या व्यक्तींनी इनामे, बक्षिसे, पेन्शने यांच्यासाठी एकच हाकाटी चालविली. तेव्हा एल्फिन्स्टनने अशा फितुरांचा एक who's who च तयार केला व प्रत्येकाला काय बक्षिसे द्यावयाची ते ठरविले. त्यातील एक नोंद अशी : बळवंतराव वैद्य ६०० रुपये. याच्या सुंदर मुलीला पेठ्यांकडे दिले होते. या 'हेलन'ची कहाणी सर्व जगास माहीत आहे. हा उल्लेख शोध घेण्याजोगा आहे.

दक्षिणेचा कमिशनर या नात्याने पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशात राज्यव्यवस्था लावण्याचे काम एल्फिन्स्टनकडे आले. न्यायव्यवस्था, शिक्षण व जमीन महसूल या शासनाच्या तीन अंगांचे तपशीलवार वर्णन या पुस्तकात आले आहे. मूळची न्यायव्यवस्था टिकविण्याचा एल्फिन्स्टनचा आग्रह, हिंदू कायद्याचे 'कोड' करण्याची त्याची धडपड, न्यायसंस्था व शासन यांची फारकत व्हावी म्हणून त्याने केलेले प्रयत्न यांचे वर्णन मुळातूनच वाचले पाहिजे. एतद्देशीय ज्ञानच येथील शाळांतून द्यावयाचे की पाश्चात्य ज्ञान द्यावयाचे याबद्दलचा वाद, देशभाषांतून पुस्तके व्हावीत म्हणून केलेले प्रयत्न, पुण्यातील संस्कृत कॉलेज, मराठी शब्दकोश यांच्या हकीकती वाचताना आपण वर्तमानकाळाच्या किती नजिक येऊन ठेपलो आहोत याची जाणीव होऊ लागते. त्यावेळचे कित्येक प्रश्न अजूनही सुटलेले नाहीत.

या चरित्रातील तिसरा माहितीचा भाग म्हणजे इकडे आलेल्या ब्रिटिशांच्या समाजाच्या माहितीचा. इकडे आलेले

बहुसंख्य इंग्रज दुय्यम योग्यतेचेच होते. बहुतेक जण वशिल्याचे असत. खुद्द एल्फिन्स्टन व त्याचा आतेभाऊ एल्फिन्स्टनच्या काकाच्या वशिल्याने आले होते. इकडे खूपसा पैसा मिळवायचा व त्याच्या व्याजावर इंग्लंडात म्हातारपण घालवायचे ही सर्वांची वृत्ती. इकडे येणाऱ्यात स्त्रिया कमी. त्यामुळे अनेकजण लग्नाशिवायच असत. बरेच जण दारू, जुगार यांच्या नादी लागलेले.

त्यावेळी सर्व मिळून इंग्रज ३५–४०,००० असतील. त्यांचे एक बेटच तयार झाले होते. असे एकाकी पडल्याने वरकरणी त्यांच्यात एकोपा व शिस्त दिसे पण आतून कुरबुरी व हेवेदावे असतच. साम्राज्याच्या उभारणीत अचाट कर्तृत्व दाखविणारे हे लोक एखाद्या कारखान्याच्या वसाहतीतील अधिकारी मंडळी अशी शुद्र कारणांवरून भांडतात तसे भांडत. एल्फिन्स्टन व सर एडवर्ड वेस्ट यांच्या भांडणाची हकीगत अशीच आहे. एल्फिन्स्टनने दिलेल्या एका मेजवानीला आपल्याला रितीने वागविले नाही अशी एक तक्रार वेस्टने केली आहे. इंग्रजांच्या कृत्रिम शिष्टाचाराची एक झलक येथे आपणास दिसते. बाजीरावाच्या गुप्त-खजिन्याचा शोध घेतानाही इंग्रजी अधिकाऱ्यांचा स्वार्थ व खाबूगिरी दिसून येते.

या आनुषंगिक गोष्टी दूर केल्या की उरतो तो एल्फिन्स्टनचा चरित्रपट आणि त्याचे कर्तृत्व. एका जुन्या पण उतरतीला लागलेल्या स्कॉटलंडच्या सरदार घराण्यातील एल्फिन्स्टनचा जन्म १७७९ साली झाला. त्याचे दोन काका मात्र कर्तबगार निघाले. त्यापैकी एक ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालक मंडळाचा अध्यक्ष होता. त्याच्या वशिल्याने १७९५ मध्ये एल्फिन्स्टन हिंदुस्थानात आला. लहानपणी त्याच्या हुशारीची चमक दिसली नव्हती. हिंदुस्थानात बनारस येथील कोर्टात त्याची कारकून म्हणून नेमणूक झाली. त्यावेळी त्याने फार्सी भाषेचा अभ्यास केला. १८०१ ते ३ पर्यंत पुण्यातील रेसिडेन्सीत तो दुय्यम अधिकारी होता. त्याच वेळी बाजीरावाने तैनाती फौज स्वीकारली व म्हणून इंग्रजांचा नागपूरकर भोसले व शिंदे यांच्याशी झगडा झाला. त्या मोहिमेत इंग्रजांच्या हेर खात्याचा तो तो प्रमुख होता. पुढे नागपूरचा रेसिडेंट म्हणून त्याने १८०७ पर्यंत काम पाहिले. १८०७ ते ९ या कालात त्याला काबूलला वकील म्हणून धाडण्यात आले.

काबूलहून परत आल्यावर १८१० मध्ये पुण्यास रेसिडेंट म्हणून त्याची नेमणूक झाली. त्याची पहिली कामगिरी पेशवे व त्यांचे जहागीरदार यांच्यातील झगडा मिटविण्याची होती. पेशव्याचा उद्देश तैनाती फौजेचा उपयोग करून जहागिरदारांना दडपण्याचा होता. पण एल्फिन्स्टने मध्यस्थी करून वाटाघाटींनी तंटा सोडविण्याचे ठरविले. अशा रीतीने इंग्रजांचे घोडे अंतर्गत बाबतीत पुढे सरकविले. त्यानतर गंगाधरशास्त्र्याचे प्रकरण उद्भवले. गंगाधर शास्त्र्याचा खुनास त्र्यंबकजी जबाबदार आहे या विषयी एल्फिन्स्टनला काडीची शंका

नव्हती. म्हणून त्र्यंबकजीला ताब्यात घेऊन त्याने ठाण्याच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. पण त्र्यंबकजी तेथून निसटला.

१८१६ व १७ ही वर्षे पेशवे व इंग्रज यांच्यातील तणाव वाढण्यातच संपली. १८१७ च्या नोव्हेंबरात लढाईला सुरुवात झाली व तिचा शेवट मार्च १८१८ त पेशवाई संपण्यात झाला. या लढाईत इंग्रजांकडील राजकारणाची सूत्रे एल्फिन्स्टनच्या हाती होती. १८१८ ते १९ ही दोन वर्षे महाराष्ट्राचा कमिशनर म्हणून जिंकलेल्या भागात इंग्रजी राज्याची घडी बसविण्याचे काम एल्फिन्स्टनने केले. १८१९ ते १८२७ पर्यंत तो मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता. या काळात महाराष्ट्राखेरीज गुजरात व सौराष्ट्र येथील कारभारही त्याच्याकडे होता.

१८२७मध्ये निवृत्त होऊन एल्फिन्स्टन इंग्लंडला गेला व ३२ वर्षांच्या निवृत्तावस्थेनंतर १८५९ मध्ये मरण पावला.

एल्फिन्स्टनच्या जीवनाच्या या संक्षिप्त आढाव्यावरूनही त्याचे अष्टपैलू कर्तृत्व कळून येईल. त्याच्या अधिकारी जीवनाचा तपशीलवार विचार करताना तर ते अधिकच नजरेत भरते. वकील म्हणून पुण्यात वावरताना त्याची चोहीकडे नजर होती. पेशवा, त्याचे कारभारी व राजमंडळ यांच्यातील सर्व बारकावे तो जाणत होता. यांतील प्रमुख व्यक्तींचे स्वभाव, जातीय कुरबुरी यांविषयींची त्याने पाठविलेले अहवाल वाचनीय आहेत. त्याचे हेर खाते इतके कार्यक्षम होते की स्वत: पेशव्यानेच माझ्या जेवणातील पदार्थसुद्धा रेसिडेंटला कळत असत असे म्हटले आहे. बाजीरावाच्या रखेल्या, त्याचे हुजरे व खुशमस्करे यांच्यापासून तो मुख्य कारभाऱ्यापर्यंत सर्वजणांकडून त्यास माहिती कळत असे.

महाराष्ट्राचा सर्व कारभार हाती आल्यावर त्याची मुत्सद्देगिरी, कारभार कौशल्य अधिकच तेजाने झळकू लागतात. पेशवाई गेल्यावर येथील ब्राह्मणांना खुश करण्यासाठी त्याने प्रमुख क्षेत्रातील ब्राह्मणांना इनामे, देणग्या व बक्षिसे दिली. मराठा लोकांना आसरा म्हणून साताऱ्याचे संस्थान निर्माण केले. जमीन धारा ठरवून आणि वसुली मक्त्याने देण्याची पद्धत बंद करून रयतेला समाधान दिले. पेशवाईच्या शेवटच्या काळात पेंढाऱ्यांची पुंडाई दरोडेखोरी यामुळे प्रांत ओसाड पडला होता. जीवित व वित्त यांची खात्री नव्हती. पोलिस व सैनिकी बंदोबस्त वाढवून देशात शांतता स्थापन करून एल्फिन्स्टनने जनतेचे धन्यवाद मिळविले.

शिक्षणासंबंधी एल्फिन्स्टनसमोर दोन पर्याय होते. एक म्हणजे जुनीच पद्धती कायम ठेवणे व दुसरा म्हणजे आधुनिक पाश्चात्य शिक्षण देणे. एल्फिन्स्टनच्या कारकिर्दीत मुख्यत: जुनेच शिक्षण चालू राहिले. पण त्याचा उद्देश पाश्चात्य शिक्षण जनतेस द्यावे असा होता. या शिक्षणाने एतद्देशीय जागृत होऊन स्वातंत्र्य मागतील हा धोका त्याला दिसत होता. परंतु अशा धोक्याला घाबरून सरकारने आपले कर्तव्य टाळणे अनीतीचे आहे असे त्याचे

मत होते. याच संदर्भात दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मिशनऱ्यांच्या हालचालींना त्याचा सक्त विरोध होता.

आधुनिक युगाचे महाराष्ट्रातील बीजारोपण एल्फिन्स्टनच्या काळात झाले. त्यातील महत्त्वाचा कार्यभाग त्याचाच होता. त्या काळात जे प्रश्न निर्माण झाले त्यांची सोडवणूक अजूनही झालेली नाही. यादृष्टीने महाराष्ट्राच्या इतिहासातील हा भाग निश्चितच अभ्यसनीय आहे. तथापि शिवाजीनतर महाराष्ट्राच्या इतिहासात अभ्यसनीय असे काही नाहीच अशा कोत्या समजुतीचे एक वातावरण सध्या निर्माण झाले आहे. त्यामुळे मराठी दृष्टिकोनातून आणि मराठी भाषेत प्रस्तुत एल्फिन्स्टन चरित्रासारखे ग्रथ निर्माण होणे कठीणच दिसते. (डॉ. कुलकर्णी यांनी ग्रँट डफचे मराठी चरित्र नुकतेच प्रसिद्धिले आहे, हा एक अपवादच.) अशा स्थितीत एल्फिन्स्टनच्या ह्या वाचनीय इंग्रजी चरित्राने मोठीच उणीव भरून काढली आहे असे मानले पाहिजे. ◻

**पुरुष–विशेष**

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन्
लेखक : आर. डी. चोक्सी.
प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन.
पृष्ठसंख्या : ४५९
किंमत ६० रु.

---

टीप : वर ज्या 'हेलन'चा उल्लेख आला आहे तिच्याविषयी 'पेशवाईची अखेर' या बखरीत माहिती मिळते ती खाली दिली आहे.

काशीबाई पेठी, त्र्यंबकराव अमृत पेठे याची स्त्री, शके १७१८ पासून नेहमी श्रीमंतांकडे येत जात होती. मर्जीप्रमाणे वागून श्रीमंतांची मर्जी हरवक्त खुष करीत होती. पुढे होळकराचे दंग्याचे समई श्रीमंत वसईस गेल्यावर शके १७२४ त त्र्यंबकराव पेठे यांस अमृतराव साहेब यांनी महाराजाची वस्त्रे आणावयास सातार्‍यास पाठविले. त्यांजवरून पुढे श्रीमंत पुण्यास आल्यावर गैरमर्जी होऊन त्यांचा सरंजाम व इनाम गाव वगैरे सरकारातून घेतले, आणि काशीबाई लोभात सबब दोन हजार रुपये सालीना खर्चास द्यावयाचे ठरविले. पुढे काशीबाई मर्जीप्रमाणे न वागे व त्र्यंबकराव यांची व काशीबाईची कटकट होऊन काशीबाईची बहुत गैरचालीची वर्तणूक सरकारात मशारनिल्हेनी समजाविली. सबब काशीबाईस कैद करून त्र्यंबकेश्वराचे किल्ल्यावर पाठविली. तेथून पुढे जुनरास आणून ठेविली. तेथे मेली. ◻



## जबानी तिसरी । हप्ता दुसरा

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

तर ते जाऊ दे. मोठाल्या गोष्टी सोडून देऊ. कशाला पाहिजेत त्या! त्यापेक्षा घरगुती गोष्टीच बोलतो. नेताजीच्या संगतीतलं आयुष्य! नेताजी —एक घरगुती माणूस!

काँग्रेसचे अध्यक्ष झालेल्या देशगौरव सुभाषचंद्रांना तुम्ही ओळखता. आमच्यापैकी बरेचजण त्यांना ओळखत नाहीत. पण आझाद हिंद सेनेच्या सरसेनापती नेताजींना आम्ही सगळेच ओळखतो. तुम्ही कुणीच ओळखत नाही त्यांना. पण ह्या दोन्ही माणसांच्या गोष्टीपण राहू देत. त्यापेक्षा मी एका घरच्या माणसाच्या घरगुती गोष्टीच ऐकवतो.

तो होती एप्रिल महिन्याची पाच

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय्

तारीख. साल १९४४.

अठरा दिवसांपूर्वी आझाद हिंद सेनेच्या पहिल्या तुकडीनं कोहिमाच्या वाटेनं टंगू नदी ओलांडून भारताच्या भूमीत पाऊल ठेवलं होतं. आता नेताजी स्वतःच लढाईच्या आघाडीवर जाणार होते. प्रवासाची सगळी तयारी झाली होती.

आपण परत येईपर्यंत माझा डेरा आपल्याच खोलीत टाकायला नेताजींनी मला सांगितलं. ते मला त्यांच्या झोपायच्या खोलीत घेऊन गेले. आपल्या पेटचाविटचा सगळं कुठंकुठं ठेवलंय् ते त्यांनी मला सांगितलं.

म्हणाले—त्यापेक्षा असं कर. तू हीच खोली घे. इथं माझं रोलटॉप आहे. तुला लिहायला–बिहायला सोयीचं जाईल.

ते आणखी बोलणार होते. पण मी त्यांना मधेच थांबवलं.

म्हणालो—राहू दे. मी काही ह्या खोलीत रहात नाही. तुम्ही तुमच्या वस्तू जिथं–जशा ठेवल्याय्त त्या तशाच असू देत. मी शेजारच्या खोलीत येतो.

—पण ह्या खोलीत हवा न् उजेड जास्ती आहे.

आता मी त्यांना कसंकाय समजावून सांगू की, इथं हवा न् उजेड कितीही जास्ती असला तरीदेखील तुम्ही इथं नसताना तुमच्या टेबलावर बसणं न् तुमच्या अंथरुणावर झोपणं काही मला

जमायचं नाही म्हणून ?

खरंतर मला त्या खोलीला कुलुप ठोकायचं होतं. दिवसातनं एकदाच ती खोली उघणार होती. केर काढण्यापुरती.

मे महिन्याच्या मध्याच्या सुमाराला एक दिवस संध्याकाळी ते अचानक परतले. रंगूनमधे बरीच महत्त्वाची कामं होती. त्यामुळं ह्या खेपेला बरेच दिवस इथं रहावं लागलं त्यांना.

सकाळी उठायला त्यांना बहुतेक उशीरच व्हायचा. साहजिकच आहे. कारण रात्री झोपायलापण ते फार वेळ करायचे. मग राजकारणावरचं एखादं पुस्तक नाहीतर काहीतरी धार्मिक पुस्तक वाचत बसायचे टेबललँपच्या उजेडात. हे वाचन चालायचं रात्रीच्या शेवटच्या प्रहरापर्यंत. त्यामुळं सहा ते सातच्या आधी उठणं त्यांना जमायचंच नाही. तोंड धुवून आंघोळीचं झंझट उरकायला आणखी अर्धा तास जायचा. अन् बरोबर आठला ते न्याहरीला बसायचे. ह्या बेड-कम-ऑफिसच्या खोलीतच. न्याहरीला त्यांच्या वाट्याला यायची दोन हाफ-बॉइल्ड अंडी न् दोन कप चहा. हा चहा मात्र ते सकाळ-संध्याकाळ संधी मिळेल तेव्हा प्यायचे.

रंगूनमधे कर्नल राजू होते नेताजींचे खाजगी डॉक्टर. त्यांचं बिऱ्हाडपण ह्याच घराच्या दुसऱ्या मजल्यावर होतं. माझ्या खोलीच्या वरोवर समोर. हे डॉक्टर राजू जवळजवळ रोजच माझ्याकडे तक्रार करायचे नेताजींबद्दल. म्हणायचे —ह्यांना सांभाळणं कठीण आहे फार. प्रत्येकच गोष्टीत ह्यांना काही धरबंध नाही ! चहा न् सिग्रेट कधीच सीम सोडून गेलंय् ! वर परत सुपारी ! कायम गालफडात एक खांड हवंच ! मी सांगितलंय्, तीनचार सेटपेक्षा जास्ती खेळू नका म्हणून. पण बॅडमिंटनची रॅकेट हातात पडली रे पडली की आठ-नऊ सेट्सशिवाय सोडतच नाहीत ! ह्या वयात असं करणं बरं नाही.

बिचाऱ्या डॉक्टरना हीच काळजी ! न्याहारी झाली की नेताजींची दिवसाची पहिली सिग्रेट पेटायची. की मग चालूच. एकामागोमाग एक. दिवसभरात किती पाकिटं ते फुंकून टाकायचे ते काही मी मोजून पाह्यलं नाही. तरी तीस-चाळीस सिग्रेटी तरी नक्कीच होत असतील. हा आकडा रोजच्या कार्यक्रमावर अवलंबून असायचा. म्हंजे जपानी सेनापतींच्या वरोबर तीन-चार तास चालणारी चर्चा ज्या दिवशी असायची, त्यादिवशी तीन चार तास सिग्रेटची साखळी अतूट चालायची हे ठरलेलंच होतं. त्यादिवशी काड्यांची तेवढीच बचत. असं हे सिग्रेट पिणं चालायचं रात्रीचे बारा वाजेपर्यंत. बारानंतर मात्र एकपण नाही. तरी रात्रीचे दोन-तीन वाजेपर्यंत ते जागे असायचेच. पण सिग्रेट बंद. त्याला तसंच कारणही होतं. फॅन सोडून, मच्छरदाणी लावून नेताजी पडल्या पडल्या वाचायचे. पण मच्छरदाणीत पडल्या पडल्या सिग्रेट कशी ओढणार ? शिवाय ते तसं धोक्याचं पण होतं.

नेताजी जे हातात घ्यायचे ते अगदी तडीला लावल्याशिवाय सोडायचे नाहीत. त्यांच्या स्वभावातली ती एक

खास गोष्ट होती. एवढंच काय पण सिग्रेटपण ह्या फॉर्म्युल्यातनं सुटायची नाही. मी स्वतः सिग्रेट पिणारा. त्यामुळं त्यांचं सिग्रेट पिणं बारकाईनं बघायचो. जेव्हा ते खोल विचारात गढून जायचे किंवा जेव्हां त्यांना गरमागरम चर्चेत भाग घ्यायला लागायचा तेव्हा सिग्रेटचे झुरकेपण आपोआप जोरात व्हायचे. एक सिग्रेट संपली की तिच्याच थोटकावरनं दुसरी सिग्रेट शिलगवायचे. संपलेलं थोटूक जेव्हा अँश-ट्रेत पडायचं तेव्हा त्याची उंची अर्ध्या इंचाचीदेखील राह्यलेली नसायची. खोलीतल्या सगळ्या लोकांनी एकच अँश-ट्रे वापरला तरी कुठलं थोटुक नेताजींच्या ओठांच्या स्पर्शानं धन्य झालंय् ते अगदी सहज सांगता येण्याजोगं असायचं.

रावत म्हणायचे—हे सिग्रेटी अशा का हो पितात? ह्याच्यामागं आर्थिक कारण तरी नक्कीच नाही—

भास्करन म्हणायचा—नाही नाही! त्यांचा स्वभावच आहे तसा. निम्म्या वाटेवर काहीही सोडून देणं त्यांच्या रक्तातच नाही. सगळं शेवटाला नेऊन मगच सोडायचं! त्यामुळं सिग्रेटीशीपण त्यांचा आपला निर्णायक लढा चालू असतो!

आम्ही खो-खो हसायचो.

डॉक्टर राजू म्हणायचे—पण असं शेवटपर्यंत सिग्रेट ओढणं तब्येतीच्या दृष्टीनं हानिकारक आहे.

मग रावत विचारायचे—अय्यरसाहेबांचं काय मत आहे? का हो, तुम्ही काही आमच्यासारखे जंगली नाहीत. तुम्ही करा ना खुलासा ह्या मुद्द्याचा.

मी म्हणायचो—करतो करतो! पण मग तुम्हांला एक गोष्ट सांगायला पाहिजे. बायबलमधे एक गोष्ट आहे. प्रभू येशूला त्याच्या एका भक्तानं जेवायला बोलावलं. आणखीही निमंत्रित होते. एवढ्यात येशूच्या लक्षात आलं की यजमानीणबाई चांगल्याच हबकून गेल्यायत. येशूनं त्यांना बाजूला घेऊन कारण विचारलं तशी यजमानीणबाईंनी दुःखानं सांगून टाकलं की दारू अजिबात शिल्लक नाही. तेव्हा येशू एका मोठ्या पिपाकडे बोट दाखवून म्हणाला—का? ही काय, आहे की!

—नाही, ती दारू नाही. पाणी आहे त्यांच्यात.

—बघू! झांकण काढ वरं!

यजमानीणबाईंनी नाइलाजानं पाण्याच्या पिपावरचं झांकण काढलं अन् त्या दचकल्याच. पिप उत्कृष्ट दारूनं भरलेलं होतं!

ही झाली बायबलची गोष्ट! पण मी वेगळीच गोष्ट सांगणाराय्. कवी गोल्डस्मिथ जेव्हा विद्यार्थी होता, तेव्हा त्याच्या क्लास-टीचरनं विद्यार्थ्यांना ही गोष्ट सांगितली. अन् म्हणाले की ह्याचा खुलासा तुम्ही लिहून आणा.

वर्गातल्या पोरांनी लांबलचक निबंध लिहिले. प्रभू येशूचं अलौकिक सामर्थ्य, यजमानीणबाईंना पेचातनं सोडवायची त्याची तत्परता. असे मुद्दे फुगवून-फुगवून पोरांनी लिहून काढले.

कवि गोल्डस्मिथनं मात्र अवघं

एकच वाक्य लिहिलं होतं ते असं— The water saw its Master and blushed ! बस् !

लगेच भास्करन म्हणाला--म्हंजे तुम्हीपण नेताजींच्या सिग्रेट ओढायच्या ह्या सवयीचा खुलासा असाच एका वाक्यात करणारायत वाटतं ?

मी म्हणालो--हो ! ज्याला म्हणून त्यांचा स्पर्श होतो त्याला पुरती आत्माहुति देण्यावाचून गत्यंतरच रहात नाही.

पण हे जाऊ दे. मी काय सांगत होतो ?

हा ! सकाळी कधीकधी आयुर्वेदिक औषध खाताना ते दिसायचे. तिथंहि हीच तऱ्हा. स्वतःच्या शेल्फच्या कुठल्यातरी कप्प्यातनं दगडी खलणी काढायचे. हात साबणानं धुऊन घेऊन खलात औषधाचं चूर्ण टाकायचे. कसलेल्या हातानं दोनचार थेंब मध त्याच्यात घालायचे. अन् मग स्वतःच्या हातानं औषध खलणं चालायचं. अशा काही कसबानं त्यांचं ते काम चाललेलं असायचं की वाटावं, रॅव्हेन थॉ कॉलिज म्हंजे आयुर्वेदाचंच कॉलिज असणार ! खलूनखलून औषध एकजीव झालं की ते वेगळ्या भांड्यात काढणंबिढणं काही नाही. सरळ खलातनं औषध चाटून फस्त करायचे. लहान पोरगं गुळांबा चोरून खातं ना, तसंच ! अन् छोटासा दगडी बत्ता म्हंजे जणू लॉलिपॉपची स्टिकच ? दोनचार मिनटच लागायची हे सगळं व्हायला. पण मी कधी तिथं असलो तर अनिमिष बघत राह्यचो त्यांचं औषध घ्यायचं ते कर्मकांड. नजर फिरवताच यायची नाही त्याच्या पास्नं. औषध घेऊन झालं की त्या खलणीवर माशी बसायची नाही की मुंगळा लागायचा नाही. मिनिटभर आधी ह्या खलणीत मध होता म्हणून ओळखायची कुणाची बिशाद होती ! फोरेन्सिक लॅबोरेटरीवाल्यांनी ओळखलं असतं मात्र !

औषध प्यायचे तेव्हा एक थेंबदेखील ग्लासात बाकी राह्यचा नाही. अर्थात् औषध घेतल्यावर दोनेकदा त्याच ग्लासात पाणी ओतून घेऊन ते पाणीपण ते पिऊन टाकायचे म्हणा.

ते बघितलं की मला आर्य चाणक्याची आठवण व्हायची. पायात घुसलेलं कुसळ उपटून काढून काही समाधान नाही त्याला. तर त्या काट्यानं परत डोकं वर काढायला नको असापण बंदोबस्त करायला हवा.

पण बोलण्याच्या नादात कुठल्याकुठं आलो मी. काय सांगत होतो ?

हा ! रंगूनला असताना सकाळी नेताजींचं कायकाय चालायचं ते सांगत होतो मी.

तर न्याहारीनंतर जर सकाळी कुणी भेटायला वगैरे आलेलं नसलं, की ते लगेच निघून जायचे इंडियन इंडिपेंडन्स लीगच्या मुख्य कचेरीत. तिथं अकराबारा वाजेपर्यंत ते काम करायचे.

मग परतायच्या वाटेवर सरसेनापतींच्या कचेरीत. तिथं तासेकभर जायचा.

दरम्यान दोन्ही ठिकाणी—कर्नल राजूंच्या म्हणण्याप्रमाणं--कित्येकदा

'विषपान'! म्हंजे चहा पिणं.

दुपारचं जेवण म्हणून एक चीज असते हे विसरून जाणं ही नेताजींची नित्याचीच बाब! त्याची आठवण करून द्यायचं काम त्यांच्या पर्सनल स्टाफकडे. पण गंमत अशी की त्यांचा मात्र नेताजींना विसर पडायचा नाही कधीच. प्रत्येक वेळेला चहाचा कप हातात घेतला की ते विचारणार—राजूना चहा दिलास? भास्करनला दिलास?

मग कर्नल राजू किंवा नेताजींचे दोन ए-डी-सी—म्हंजे रावत न् समशेर-सिंग—हुषारीनं म्हणायचे—भुकेल्या पोटी आता चहा नको सर!

त्यांचा मुद्दा नेताजींच्या ध्यानात आल्यावाचून राह्यचा नाही. ते गाला-तल्या गालात हसायचे. म्हणायचे—मग इतक्या आडवळणानं कशाला सांगतोस रे बाबा! ठीक आहे, चला तर, आता लंचलाच जाऊ या!

म्हंजे दुपारचं जेवायला बसायला दोन वाजायचे. आम्ही सगळे एकाच टेबलावर बसायचो. बेत अगदी साधा असायचा. भात, उकडलेली भाजी, एक प्लेट दही, केळं अन् 'मधुरेण समापयेत्' म्हणून साखरेसकट कॉफी.

ह्या जेवणातलं केळ्याचं प्रकरण खास सांगायलाच पाह्यजे असं आहे.

सबंध जेवणाचं वाटप करणारा काली जेव्हा केळ्यांची प्लेट घेऊन यायचा, तेव्हा आम्ही सगळे एक मनोरंजक संवाद ऐकण्याकरता उत्सुक होऊन जायचो. हा संवाद म्हंजे दुपारच्या जेवणाच्या टेबलावरच्या नित्यकर्मा-तलाच एक भाग झाला होता. काली आल्यापास्नंच एक दबलं हसू प्रत्येकाच्या ओठाशी यायचं.

काली वयानं लहान होता. बावीसेक वर्षांचा असेल. त्रेचाळीसच्या जुलैमधे नेताजी जेव्हा पहिल्यांदा सिंगापूरला आले, तेव्हापास्नं तो नेताजींचा टेबल-बॉय बनला. मलायातनं मुख्य कचेरी हलवून ब्रह्मदेशात आली. तसा काली पण आपलं घरदार् सोडून नेताजींच्या-बरोबर रंगूनला आला. त्याच्या घरी म्हणे आई-बाप-भावंडं यांच्याखेरीज नुक्तीच लग्न झालेली एक किशोरी नववधूपण होती. जो कुणी नेताजींचं चरित्र लिहील त्याला माझं अगदी हात जोडून सांगणं आहे की, ह्या मुलीला त्यानं 'काव्यातली उपेक्षिता' करून ठेवू नये!

आपल्या झगझगीत दातांनी हसत काळा कुळकुळीत काली केळी घेऊन जेवायच्या खोलीत यायचा. अन् नेताजीं-च्याबरोबर त्याची काही गंभीर चर्चा व्हायची.

नेताजी विचारायचे—काली, आज केला का कितना दिया?

म्हंजेच—केळी केवढ्याला पडली?

हा प्रश्न रोजच गरजायचा. फरक एवढाच की भाषा रोज बदलायची. पण मूळ मुद्दा मात्र कायम एकच असायचा. त्यात काहीच बदल व्हायचा नाही.

—आज क्या भाव है?

—काली, आज बनाना कैसा मिला?

—बनाना का भाव बढता है क्या?




# जास्त मुलं म्हणजे पुढल्या काळात जास्त उत्पन्न ही समजूत बरोबर आहे ?

असं म्हणतात कीं, प्रत्येक मूल स्वतःबरोबर दोन हातहि घेऊन येत, म्हणजेच जास्त काम करून जास्त पैसे मिळवूं शकतं.

पण, माणसाला आयुष्यभर खायला लागत असलं तरी जीवनाचा कांही काळच अन्नासाठी कमावतां येतं, हें विसरून चालणार नाहीं.

आधुनिक पद्धति वापरून उत्पादन वाढवतांहि येईल. पण त्यासाठीं पाहिजे कौशल्य आणि शिक्षण.

शिकलेला माणूस एकंदर आयुष्यांतच जास्त पुढें जाऊं शकतो. तुम्हांला जास्ती मुलं असलीं तर त्यांचं शिक्षण, फार काय, व्यवस्थित पोषणहि कठीण जाईल.

पुष्कळ, परंतु न शिकलेल्या, आजारी, अशा मुलांपेक्षा, थोडीशीं, पण शिकलेलीं, निरोगी मुलं जास्त कमाई करूं शकतील.

davp 72/382

रोज हे असं पाहिल्यावर कुणाला वाटलं असतं कुठल्या केळयांच्याबद्दल बोलतायत कुणास ठाऊक !

उत्तर म्हणून काली रोजच लाजरं चोरटं हसू द्यायचं. अन् त्याचं अनुपान म्हणून मग भाव सांगायचा. ज्या दिवशी भाव जरा जास्ती वाटायचा, त्यादिवशी नेताजींच्या चेहऱ्यावर चक्क काळजीचा घोर दिसायचा.

मग ते काळजीच्या सुरात विचारायचे —काली, बनाना बहुत महंगा हो गया ! कल से कैसे खरीदेंगे ?

ही निव्वळ थट्टा आहे हे कळण्या-इतका काही काली अडाणी नव्हता. पण तो अशा काही गंभीरपणानं न् सहानुभूतीनं मान हलवायचा की जणू उद्यापण केळी खायची असली तर नेताजींना आजच्या आजच आझाद हिंद बँकेतनं ओव्हरड्राफ्टची सोय करावी लागणार होती ! मान हलवून झाल्या झाल्या तो पाठ फिरवायचा न् फिक्कन् हसायचा.

अगदी लहान पोरासारखं नेताजी ह्या छोटयाशा नाटकाचा आनंद लुटायचे.

अन् जेवायच्या टेबलावर ज्या दिवशी कुणी बाहेरचे पाहुणेरावळे असायचे, तेव्हातर नेताजींच्या थट्टा-मस्करीला अगदीच उधाण यायचं. नाना विनोदी किस्से ते सांगायचे. जेवायच्या वेळी गंभीर चर्चा त्यांना अजिबातच पसंत पडायची नाही. जेवणात त्यांना काही रस होता असं नाही, पण सैंपाका-तल्या पदार्थांच्याबद्दल ते नेहमीच बोलायचे. म्हंजे भारतातल्या कोणत्या प्रांतात अमुक एक भाजी कशी करतात ते ऐकवायचे. आम्हाला शंका यायची— आधीची आपली समजूत चुकीची होती वाटतं ! रॅव्हेन शॉ कॉलेजमध्ये आयुर्वेद नाही, सैंपाकपाणीच शिकवत होते. बाकीचे पाहुणेलोकपण ह्या चर्चेत मोकळे-पणानं भाग घ्यायचे. आपापली मतं सांगायचे.

एक दिवस रात्री, मला आठवतंय्, यल्लप्पाजी जेवायला होते. जेवण जवळ-पास संपायला आलं होतं. दही समोर आलं होत. तेव्हा बोलणं दह्याबद्दलचंच निघालं.

कुणीतरी म्हणालं—गाईच्या दह्या-पेक्षा म्हशीचं दही चांगलं लागतं. असतं पण चांगलंच.

नेताजींनी पाठिंबा दिला.

पण यल्लाप्पाजींनी विरोध केला. म्हणाले—म्हशीचं दही खायला चांगलं लागत असेल, पण तरी ते रोज खाल्लेलंच बरं.

—का ?

नेताजींनी विचारलं.

—रोज म्हशीच्या दुधाचं दही खाल्लं तर बुद्धिभ्रंश होतो, माणूस मद्दड बनतो.

ही गोष्ट काही मला माहित नव्हती. हे तुम्हास कसं काय कळलं म्हणून मी सरळ विचारणार होतो.

पण त्याच्याआधीच गंभीरपणानं नेताजी म्हणाले—तुम्ही स्वतःच्या अनु-भवावरनंच सांगताय्, तर वाद काय घालणार ह्यात !

यल्लाप्पाजी जरा गांगरलेच.

पण लगेच सगळेच हसायला लागले. त्यात यल्लप्पापण होतेच.

नेताजी खोटया गंभीरपणानं म्हणाले काय झालं बुवा? तुम्ही हसताय् ते असं ?

परत एकदा सगळे हसायला लागले.

आणखी एक दिवस. त्यादिवशी आमच्याकडे पाहुणे होते आनंदमोहन सहाय. आझाद हिंद सरकारचे सेक्रेटरी जेवण नुकतंच झालं होतं. आम्ही सगळे कॉफी पीत होतो.

बोलता बोलता शांघायच्या स्वयंसेवक शिबिराची गोष्ट निघाली. ह्या शिबिराच्या कारभाराबद्दल काही गंभीर तक्रारी आल्या होत्या. एक चौकशी होऊन जाऊ दे असं नेताजींचं म्हणणं होतं. आनंदमोहनांनी ह्या चौकशीचा भार उचलावा असं नेताजींना वाटत वाटत होतं. पण सहायजी त्यावेळी दुसऱ्या एका महत्त्वाच्या कामात भलतेच गुंतलेले होते. म्हणून मी सुचवलं— आपल्या टोकिओतल्या लीगचे अध्यक्ष आहेत ना राममूर्ति, त्यांना हे काम दिलं तर कसं ?

सहायजींना काही ही सूचना पसंत पडली नाही. त्यांनी विरोध केला.

नेताजींनी विचारलं—का बरं ? राममूर्ती तुम्हाला का पसंत नाहीत ?

आनंदमोहन म्हणाले— वह सीधा साधा आदमी है साब !

लगोलग नेताजींनी प्रतिप्रश्न केला अच्छा ! आपको टेढा आदमी चाहिये क्या ?

अन् नेताजी सातमजली हसले. आम्हीपण हसायला लागलो. खुद्द सहायजीपण. नेताजी काही कुणाला लागावं म्हणून बोलले नव्हते. पण शब्दांची फेकाफेक सुरू झाली की मजेदार टोला लगावायचा लोभ काही त्यांना आवरता यायचा नाही.

आणखी एका दिवशीची गोष्ट आठवतेय्.

आम्ही त्यावेळी कुआललंपूरला आझाद हिंद सेनेच्या ट्रेनिंग कँपमध्ये होतो. ही अगदी शेवटच्या काळातली गोष्ट आहे. नेताजी रंगूनहून पायीपायी मलायाला आल्यानंतरची.

सेरामबागला तेव्हा एक महत्त्वाचं कोर्ट-मार्शल चोलल होतं. एका चिनी गुप्तहेर मुलीवरनं आमचे जपानशी असलेले संबंध एकदम चिकार तणातणीचे झाले होते. जपानी सेनापतीनं त्या मुलीला ताबडतोब आपल्या हवाली करायची विनंती केली होती. जपानी लोक तसे जात्याच नम्र इथंही त्यांनी नम्रपणानं विनंतीच केली होती. 'पण त्या पत्राच्या वाक्यावाक्यातल्या विनंतीत हुकमाचाच सूर होता. ज्याअर्थी ही मुलगी भारतीय नाही, त्याअर्थी ताबडतोब जपानी शिबिरात तिची पाठवणी करावी— असं त्यांचं म्हणणं होतं.

इकडे नेताजींचा आदेश वेगळाच होता.

त्यामुळं नाइलाजानं सेरामबागहून काही ऑफिसर्स जीप घेऊन धावत आले कुआलालंपूरला. नेताजींच्याकडनं तोंडी हुकूम घ्यायला. मेजर-जनरल अलगप्पन

कर्नल ह्वीबुर रहमान, कर्नल नागर अन् डॉक्टर एम काही लष्करात नव्हते. ते होते भारतीयच. सेमराबागला डॉक्टरी करायचे. बायकामुलांना घेऊन तिथंच राहृचे. चिनी मुलगी पेशंट होती त्यांची.

बराचवेळ बोलणंचालणं झालं अन् नंतर आम्ही रात्रीच्या जेवणाला बसलो.

मी म्हणालो—आता आजची रात्र तुम्ही सगळे इथंच मुक्काम ठोका. उद्या पहाटे पहाटे निघा म्हंजे झालं.

सगळेच राजी झाले. कारण ह्या वाटेवर नेहमीच गोरिला. तुकडचा हल्ला करायच्या. रात्रीच्या अंधाऱ्यात बेछूट धावत्या जिपवर हँडग्रेनेड फेका-यचा हे तर काहीच खास नाही. तर डॉक्टर एमनी हरकत घेतली. त्यांचा कुणी पेशंट-बिशंट असेल बहुतेक. त्याची आठवण झाली असेल त्यांना.

म्हणाले—निदान मला तरी आज रात्रीच गेलं पाह्यजे.

आम्ही परत परत वाटेतल्या संक-टाची आठवण करून दिली. पण ते कसलं ऐकतात !

म्हणाले—बाबांनो, मी डॉक्टर आहे. मला तर सगळेच ओळखतात. ह्याच रस्त्यानं मी रात्रीचा कितीदांतरी गेलेलो आहे. मला कुणी काही बोलायचं नाही. तुम्ही काही मला अडवून धरू नका. हे बाकीचे लोक येऊ देत ना उद्या.

हा धोका डॉक्टरांनी पत्करावा असं काही नेताजींना वाटत नव्हतं. पण तोंड उघडून ते म्हणाले मात्र नाहीत काहीच. कारण त्यांना माहित होतं की आपली विनंती डॉक्टर आदेशासारखीच मान-तील. तेव्हा त्यांनी आडवळणानं डॉक्टरांची परीक्षा घेतली. डॉक्टरांना काहीच म्हणाले नाहीत. उलट त्यांनी मलाच धमकावलं—अय्यर, तुला सम-जत कसं नाही ? डॉक्टर एमना रात्रीच घरी परतायला पाह्यजे. त्यांनी शब्द दिलाय् ! उगाच नवरा-बायकोचं भांडण कशाला लावून देतोय्स तू !

डॉक्टर एम लाजले.

म्हणाले—नाही नाही सर, तसं काही नाही. म्हंजे...त्याचं काय आहे की...ठीक आहे, नाहीतर मी उद्या सकाळीच जातो.

सगळे गालातल्या-गालात हंसले.

नेताजीच तेवढे अजिबात हंसले नाहीत.

ते गंभीर होऊन म्हणाले—तुम्ही आमच्या लष्करात असता तर तुम्हाला लगेच वीर-इ-हिंद किताब दिला असता मी !

त्यांचा मुद्दा काही आमच्या लक्षात आला नाही. कर्नल हविबुरनं विचारलं —कशाबद्दल नेताजी ?

--अरे, बघितलंस ना तू ? एकाच वाक्यात त्यांनी सिद्ध करून टाकलं की गोरिला-तुकडी तर किस झाड की पत्ती, आपण साक्षात् बायकोलादेखील घाबरत नाही !

आता सगळेच हंसायला लागले. ह्या सगळ्यांच्यांतच डॉक्टर एमपण होतेच.

कधी संध्याकाळी पाऊस-बिऊस पडत असला किंवा जोरात वारा असला की श्री बॅडमिंटन बंद. मग नेताजी

संध्याकाळ पाळलेल्या प्राण्यांशी खेळण्यात घालवायचे. जिवतीच्या दयेनं हे प्राणी आणखीन् खूप होते. दोन माकडं, दोन शेळ्या, दोन ससे, तीन-चार बदकं न् राजहंस. एक तट्टूदेखील होता.

माकडं त्यांच्या अगदी आज्ञेत असायची. जोडपं होतं ते नराचं नाव होतं रामू न् मादीचं सीता.

रामू भयंकर हट्टी होता. ज्या-त्या गोष्टीत जिद्द करायचा. अन् फट्दिशी चिडायचा. त्याचा पिंजरा साफ करायला घ्यायच्या आधी काली-सुनील वगैरे एका केळयाची लांच द्यायची त्याला ! अन् मगच कामाला लागायचे.

नेताजी मात्र रिकाम्या हातानं त्याच्याकडे गेले तरी त्याची काही हरकत नसायची. उलट मोठ्या प्रेमानं तो टुण्दिशी उडी मारून त्यांच्या खांद्यावर चढून बसायचा. नेताजींच्या डोक्यावरची टोपी काढायचा न् तिची बटणं चघळून चघळून बघायचा.

नंतरनंतर मी बघायचो, माकडाच्या हातनं बटणं वाचवण्याकरता नेताजी टोपी काढून ठेवून बोडकेच रामूकडे जायचे.

त्यामुळं तर आणखीच कहर झाला. आधीच विरळ केस असलेल्या नेताजींच्या डोक्यावरले उरलेसुरले केस धरून ओढायचा.

नेताजी हसून म्हणायचे--रामू, अरे बाबा, ह्यापेक्षा तू आपला टोपीची बटणंच तोड कसा ! पण हे केसपण गेले तर माझ्या डोक्यावर नुस्तंच टक्कल राहील की रे !

आम्ही हसायचो. रामू काही हसायचा नाही. तो डोळे फिरवायचा न् अंग खाजवायचा.

दरम्यान तट्टू इकडे खुरांनी जमीन खणायला लागायचं. ह्या माकडावर एवढा वेळ का वाया घालवताय् असंच त्याला म्हणायचं असावं बहुतेक.त्यापेक्षा माझ्याकडे या ना--असं जमिनीवर पाय आपटणं !

नेताजींना प्राणी फार आवडायचे. रंगूनच्या घरात एक प्राणिसंग्रहालयच होत आलं होतं. कुत्रंच तेवढं नव्हतं. पण कुत्रंपण फार आवडायचं त्यांना. कुणाच्या घरी कुत्रं दिसलं की त्याचे भारी लाड करायचे. नाव काय, काय काय खातं, कितपत आज्ञाधारक आहे-- वगैरे विचारपूस करायचे. त्यांच्याकडे मात्र त्यावेळी एकही कुत्रं नव्हतं.

आबिद म्हणायचा--त्यांना कुणी चांगल्या जातीचं कुत्रं भेट म्हणून दिलं, तर ते नक्कीच पाळतील.

मी म्हणायचो--पण त्यांच्या प्राणीसंग्रहालयात कुत्रं का नाही, ते माहित आहे का तुला ?

आबिदला कुतूहल वाटायचं. तो विचारायचा--सांगा ना, का ते ?

--देशी कुत्रं म्हंजे गावंढळ कुत्रा ! त्याला लूत भरणार ! कुत्रं पाळायचं तर चांगल्या जातीचं विलायती कुत्रं पाळावं लागतं !

मला मधेच थांबवून आबिद म्हणाला--मग मी तेच म्हणतोय् की ! चांगल्या जातीचं विलायती कुत्रं जर आणलं--

आता मीपण त्याला मधेच तोडलं. म्हणालो--पण एक गोष्ट तू विसरून गेलायस ! नेताजींनी फार दिवसापास्नं विलायती गोष्टी वापरणं सोडून दिलंय् !

आबिद हसायला लागायचा.

तर नेताजींच्या ह्या प्राणीसंग्रहालयात कुत्रं काही आलं नाही.

अन् मांजरपण बादच. हा एकच प्राणी होता, जो नेताजींना अजिबातच सहन व्हायचा नाही. मांजर त्यांना दृष्टीसमोर नको वाटायचं.

ह्याबाबतीत एक मजेदार गोष्ट सांगतो आता. मजेदार कसली म्हणा, अगदी मर्मभेदी ! हृदयविदारक !

मेजर आबिद हुसेनचं नाव तुम्ही नक्कीच ऐकलेलं असणार. आझाद हिंद सेनेच्या हजारो सैनिकात नेताजींच्याबरोबर दोन्ही रणांगणावर हजर असलेला हा एकटाच होता. दोन्ही रणांगणावर म्हंजे जर्मनीत न् पूर्व-आशियात. मेजर स्वामीदेखील तसे दोन्ही रणांगणात नेताजींच्याबरोबर होते. पण पाणबूडीतनं, जर्मनीहून पूर्व-आशियात यायच्यावेळी नेताजींचा साक्षीदार फक्त एकच होता--हा आबिद हुसेन ! ह्या ऐतिहासिक सफरीत, नव्वद दिवसांच्या त्या लांबलचक पाण्याखालच्या प्रवासात, भारतीय सोबती तेवढा एक होता. नेताजींचा पण अगाध विश्वास होता ह्या तरुण सैनिकावर. जर्मनीत तो नेताजींचा सेक्रेटरी होता. अशा ह्या आबिदनं एक दिवस नेताजींचा कसा विश्वासघात केला त्याचीच गोष्ट ऐकवतो तुम्हाला. [ क्रमशः ]


माणूस मधून प्रसिद्ध झालेली अरूण साधू यांची लेखमाला

फिडेल चे आणि क्रांती

पुस्तकरूपात प्रसिद्ध झाली

राजहंस प्रकाशन

## SHORT SERVICE COMMISSION IN THE ARMY
## 8TH COURSE AT OTS MADRAS

Applications from male Indian citizens are invited for Short Service Commission ( Technical ) for a period of 5 years in the Corps of Engineers, Signals, Electrical and Mechanical Engineers and Regiment of artillery for the course commencing in July, 1973.

**Age Limits :** Candidates must have born not earlier than 2nd July, 1946 and not later than 1st July, 1953.

**Qualifications :** (a) A Degree / Diploma (equivalent to degree) in Electrical, Mechanical, Civil, Architecture, Automobile, Telecommunication or Metallurgical Engineering recognised by the Ministry of Education for recruitment to superior posts under Central Government. OR ( b ) Any other Degree / Diploma ( equivalent to Degree ) in Civil, Electrical, Mechanical, Architecture, Automobile, Tele-communication or Metallurgical Engineering recognised by the Institute of Engineers ( INDIA ) in exemption of passing Sections ' A ' & ' B ' of their Associate Membership Examination. OR ( c ) MA / MSc ( Physics ) in Wireless / Electronics / Radio Communication as a Special Subject of a recognised Indian or foreign University. Or ( d ) Diploma in Electronics, ( DMIT ), Madras institute of Technology, MADRAS. ( e ) Candidates who have appeared in the finalexamination of the Degree / Diploma mentioned in ( a ) to ( d ) above and are likely to pass the said examination before 28 Feb, 73, are also eligible to apply for the Course subject to production of a certificate from their College / Institution to this effect.

*Note* : Candidates who hold diploma in Engineering awarded by the State Board of Technical Education of any other diploma which is not equivalent to degree and has neither been recognised by the Institution of Engineers (INDIA) in exemption of passing Sections ' A ' and ' B ' of their Associate Membership Examination nor by the Ministry of Education for recruitment to superior posts under the Central Government, are not eligible.

**How to Apply** : Application form and full particulars can be had from Army Headquarters, Adjutent General's Branch. Rtg 6 (SP) (d) ( i ), West Block III, Wing No I, RK PURAM, NEW DELHI–22 on furnishing the following information :

( a ) Age and date of birth as recorded on the Matriculation or equivalent certificate. ( b ) Branch of Engineering in which Degree / Diplona (equivalent to Degree ) obtained. ( c ) Name of Institution / University from which Degree / Diploma obtained.

*Note :* Request for application form must be accompanied by an unstamped self-addressed envelope of 25 cm × 12 cm size.

**Last Dates :** For candidates residing in India–**31st January, 1973**
For those in the employ of Government –**15th February, 1973**
For those residing abroad –**28th February, 1973**

**–davp 72/397–**

थिएटर युनिटचे

# अनुष्ठान



**मध्यंतर**

सौ. पुष्पा भावे

मराठी प्रायोगिक रंगमंचावर येणारी नाटकेमुद्धा बहुतांशी कथानकप्रधान असतात. इग्रजी वा बंगाली नाटकांची रूपांतरेही बऱ्याचवेळा कथानकप्रधान असतात. किबहूना वंडखोर मानल्या गेलेल्या प्रायोगिक नाट्यसंस्थाही मलभूतत: 'नव्या' नाटकाकडे जाताना दिसत नाही. (या विधानाला काही अपवाद आहेत–'रंगायन'ने सादर केलेले 'खुर्च्या' वा अमृत नाट्यभारतीने सादर केलेले–'Waiting for Godat)' या पार्श्वभूमीवर श्री. सत्यदेव दुबे यांनी निवडलेले 'अनुष्ठान' हे ग्यानदेव अग्निहोत्री यांचे हिंदी नाटक लक्षणीय वाटते. याच नाटककाराचे 'शुतुरमुर्ग' हे नाटक (थि.यु.) मुंबईकर प्रेक्षकांनी पाहिलेले असेल. 'अनुष्ठान' या नाटकाची संकल्पनाच रंगभूमीनिष्ठ आहे. या रसिक वाचकाना–प्रेक्षकाना प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात 'अनुष्ठान' हा शब्द वापरला असता Grotowski च्या रंगभूमीचे स्मरण होईल. गेली काही वर्षे पाश्चात्य रंगभूमीवर 'Ritual' या शब्दाचा–कल्पनेचा वापर प्रायोगिक नाट्यात होत आहे. Grotowski या पोलीश दिग्दर्शकाच्या नाटकात (कोणीच लिहिलेली नसतात) संपूर्ण रगभूमीची संकल्पनाच अनुष्ठानासारखी आहे. त्यामुळे अग्निहोत्रींच्या नव्या नाटकाचे शीर्षक ऐकल्यानंतर विशेष अपेक्षा निर्माण झाल्या आणि थिएटर युनिटने सादर केलेल्या प्रयोगाने त्या बऱ्याच अंशी पुऱ्या केल्या. 'अनुष्ठान' या नाटकाची संकल्पना काहीशी अमूर्त आहे आणि तरी या कल्पनेचे सामाजिक वास्तवाशी असणारे नाते नाटककाराने व दिग्दर्शकाने नेमकेपणाने व्यक्त केले आहे.

सूत्रधार–प्रेक्षक संवादातून सुरू

होणारे हे नाटक मानवी अस्तित्वाचा, आत्मज्ञानाच्या शोधात धुक्याच्या प्रदेशात पोहोचणाऱ्या मानवी प्रवासाचा, उद्रेकी प्रतिक्रियातून आत्मनाशाकडे जाणाऱ्या क्रांतिकारकांचा अनुभव कोणत्याही कथेचा वा प्रमुख पात्रांचा आश्रय घेत नाही. कारण या नाटकात व्यक्त झालेला अनुभव कुणा एकाचा नाही. हा आपला सर्वांचा आजचा, कालचा, उद्याचा अनुभव आहे. 'हे असे का ? हे बदलले पाहिजे' ही प्रतिक्रिया प्रत्येक पिढीची आणि तरी ती अभिव्यक्त होण्याचे माध्यम वेगवेगळे ! मानवी प्रयत्नांचा शाश्वत अनुभव व्यक्त करताना त्याचे सातत्य आजोबा–वडील–मुलगा या त्रयीतून श्री. अग्निहोत्री यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी माता–पत्नी–प्रेयसी ही सारी स्त्रीत्वाची रूपे एकाच स्त्रीपात्राच्या ठायी कल्पून, प्रत्येक पुरुषाचा क्रमांक होतो अशी कल्पना करून पारंपारिक पात्रयोजनेपलीकडील बिनचेहऱ्याची पात्रे निर्माण केली आहेत. अशा प्रकारचे नाटक प्रत्यक्ष रंगमंचावर आणणे हे अवघड होते. परंतु तसे पाहिले तर ते दिग्दर्शकाचेच नाटक आहे आणि मूलत: नटसमूहाचे नाटक आहे. अशाच प्रकारच्या नाट्यात नाटक हे दृश्यमाध्यम म्हणून व नाट्यप्रयोग समूहकला विष्कार म्हणून कसास लागतात. अग्निहोत्री यांच्या नाटकांच्या कल्पना अपारंपारिक असूनही त्या तुलनेने त्यांना शब्दांचा विलक्षण मोह आहे. 'अनुष्ठान'च्या पद्धतीच्या नाटकात शब्दांचे अवमूल्यन होऊन 'अवकाशातील काव्य' (poetry in space) ही आयोनेस्कोची कल्पना प्रत्यक्षात यायला हवी.

सत्यदेव दुबे यांनी अग्निहोत्री यांच्या नाटकाचे प्रयोगरूपातील संकल्पन व दिग्दर्शन असे केले होते की त्यामुळे नाट्यसंहितेतील सैलपणाही दृष्टिआड व्हावा. या नाटकातील सर्व पात्रे (दीपा श्रीराम यांचा अपवाद वगळता) नवी होती. किंबहुना 'अनुष्ठान' सारख्या समूह नाट्यात 'नट' कल्पनेशी सहचरित नसणारी पात्रे असणे अत्यावश्यक होते. या साऱ्या पुरुषनटांनी (हर्ष भार्गव, अशोक प्रभू, प्रमोद फडके, चंद्रशेखर शेनॉय, मोहन भंडारी) नाटकाचा सूर व समूहदृश्यातील हालचालींचा मेळ अचुक साधला. दीपा श्रीराम यांनी 'स्त्री'च्या विविध भूमिका करताना त्या भूमिकांना नक्कल करण्याचे स्वरूप क्षणमात्रही येऊ दिले नाही. एरवी त्यांच्या आवाजातील अनुनासिकत्व खटकत असले तरी या नाटकातील स्त्रीची ताणलेली मनस्थिती व्यक्त करण्यासाठी त्याचा उपयोग झाला (त्यांनी निवडलेली साडीची गुलाबी रंगाची छटा मात्र सर्व भूमिकांचा विचार करता जरा गडद वाटली.)

दुबे यांचे पदन्याससंयोजन विलक्षण कुशल होते. मानवी अनुभवातील विद्रूपता, क्रौर्य सहन करणारी त्यांची पात्रे 'Theatre of Cruelty'चे स्मरण करून देत होती. आगीने होरपळणारी, रंगमंचावर गडबडा लोळणारी माणसे पहात असता या 'अनुष्ठान'मधील आदिमानवी स्वरूपाचाही प्रत्यय येत

होता. पात्रांची रंगमंचाला छेद जाणाऱ्या तिरप्या रेषेत केलेली योजना, मागील बाजूला पडदा वा सेट न वापरता अनन्न अवकाशसूचन करणारी बाजू वापरणे यामुळे 'अनुष्ठान' मधील अनुभव अधिक गहनस्वरूपात प्रेक्षकांपर्यंत पोचला. दिलीप कोल्हटकर या तरुण नट-दिग्दर्शकाने प्रकाशयोजनेतही नाटकाच्या संकल्पनेचे गांभीर्य व वातावरण राखल्यामुळे हा प्रयोग स्मरणीयच झाला.

'अनुष्ठान'च्या नाटचसंहितेतील शब्द बाहुल्याचा दोष लक्षात घेताही अग्निहोत्रींचे हे नाटक लक्षणीय आहे. दुभे यांनी सादर केलेला प्रयोग पाहताना हे लक्षणीयत्व तीव्र होते. खूप दिवसांनी खऱ्या अर्थाने प्रायोगिक नाटक पाहिल्याचे समाधान 'थिएटर युनिट'ने दिले. मराठीत आजही नाटकांचा वापर कथा सांगण्यासाठी केला जात आहे. अशा वेळी भाषेचे, नटयोजनेचे व कथात्मक नाटचरचनेचे अवमूल्यन करणारी नाटके मराठी प्रायोगिक रंगमंचावर येणे आवश्यक आहे. अशाच स्वरूपाच्या नाटकातून आपण 'Group Theatre' समूहनिर्मित-समूहदिग्दर्शित नाटच-कल्पनेपाशी पोहोचू शकू.

'अनुष्ठान'सारखे नाटक पाहताना एक प्रश्न उभा राहतो : हिंदी, कानडी, बंगाली नाटककारांच्या तुलनेने मराठी नाटककार माध्यमाविषयीचे प्रयोग फारच कमी करतात. मराठी व्यावसायिक रंगभूमीप्रमाणे मराठी प्रायोगिक रंगमंचही नको तितका स्थिर (आर्थिक-दृष्टचा नव्हे) झालेला नाही ना? ☐ ☐

## सप्रेम नमस्कार...

[ पृष्ठ २ वरून ]

मुले झाली त्यापैकी मीच फक्त जगले. माझा जन्म १९०९ साली. माझी माता मी केवळ चार वर्षांची असताना वारली. यानंतर सामाजिक सुधारणेचा दुसरा पायंडा घालण्यासाठी वडिलांनी भिन्न जातीय विवाह करण्याचे ठरविले व १९१४ साली कु. विठाबाई जाधव या मराठा पदवीधर स्त्रीशी विवाह केला. हीच स्नेहप्रभाची आई. तिचा जन्म १९१५ चा. म्हणजे तिच्यात व माझ्यात सहा वर्षांचेच अंतर. तेव्हा तिच्या आई-बद्दल 'ईर्षा बाळगणारी' कोण ? मी ? की माझी मोठी बहिण ? आणि वस्तुस्थिती अशी आहे की शिक्षणाकरिता ही बहिण १९१९ पर्यंत उमरावतीच्या बोर्डिंगमध्ये ! आणि स्नेहप्रभाची आई नोकरी निमित्ताने १९१९ पर्यंत तरी मुरादाबाद, भावनगर, सुरत या शहरी ! आणि ही वहीण तर १९२२ साली विवाहबद्ध झाली ! ती पुढे लिहिते की माझे वडिल व तिची आई यांच्यात २५ वर्षांचे अंतर होते. आणि तिची मोठी सावत्र बहिण व तिची आई या जवळ-जवळ सारख्याच वयाच्या ! वडिलांचा जन्म १८७२ चा. स्नेहप्रभाच्या आईशी १९१४ च्या सुमारास विवाह व त्यावेळी त्यांचे विठाबाईचे वय २७-२८. माझी मोठी बहिण या सुमारास १४ वर्षांची व मी तर तिच्या जन्माच्या वेळेस ६ वर्षांची ! तेव्हा वाचकांनीच

याचा निर्णय घ्यावा !

आता तिने आपल्या आईचे जे चित्र रेखाटले आहे त्याबद्दल येथे झाकली मूठ सव्वालाखाची ! आम्हाला जे भोगावे लागले ते जास्त प्रमाणात भोगावे लागले नाही याचे कारण त्यांचे तसे सतत वास्तव्य आमचेकडे नसणे हेच आहे. किंवा त्या थोड्याशा तरी ती. वडिलांना बिचकून असाव्यात. स्नेहप्रभाच्या एका सख्या अनाथ मावस बहिणीचे माझ्याजवळ काढलेले उद्‌गार आहेत ' लीला तुम्ही सावत्र मुले म्हणून तुमचा छळ झाला असे मानू नकोस. मीही खूप भोगले आहे !' ह्यांचा संतापी स्वभाव, ती. वडिलांच्याबद्दलची भावनाशून्यता, आम्हा मुलांबद्दलची द्वेष बुद्धी हीच सर्व पुढच्या धिडवडयाला कारणीभुत झाली. ती. वडिलांच्या आत्मचरित्रात हे वाक्य याबद्दल ग्वाही देत आहे, 'संसारातल्या भावना-भिन्नत्वामुळे, स्वभाव वैचित्र्याच्या, मत-वैचित्र्याच्या ठिणग्या मधून मधून उडू लागल्या. याच परिस्थितीची आच लागली व संसरात मजा उरली नाही... या वैवाहिक सबंधातून मी मात्र १०—१२ हजार रुपयास मुकलो व हाती आला भोपळा !"

स्नेहप्रभाच्या तथाकथित पितृप्रेमा-बद्दल तर लिहावे तितके थोडेच ! मी जास्त पाल्हाळ न करिता वाचकांनाच विचारते, ' जी मुलगी इतकी पितृभक्त आहे ती वडिलांनी तिच्या भेटीबद्दल १९४७ साली प्रयत्न केला तेव्हा, ' तुम्ही मला का भेटू शकता ते समजत नाही; मी मेले असे समजा. मला भेटण्यास आलात तर अपमान होईल ' असे लिहू शकेल का ? १९४७ ते १९५० पर्यंत मृत्युपर्यंत माझे वडिल माझ्याकडे ठाण्यास होते. त्या काळात ही ' पितृ-परायण ' कन्या कितीदा त्यांना भेटण्यास आली ?

बाकीची सगळी घाण तिची तिनेच उपसावी ! बाकीच्या सगळ्या लिखा-णात तिच्या अभिरुची (!)चाच प्रत्यय येत आहे. अध्यात्माबद्दल आई-वडि-लांचाच वारसा कशाला हवा ? तो तर भारतातल्या कुठल्याही व्यक्तित दिसून येतो ! भारतात जशा जन्माच्या जाती आहेत तशा ' अध्यात्म्या'च्या सुद्धा जाती आहेत ! तिला शालेय व जीवनात ओळखणारी सगळीच मेली असे तिला वाटते का ? सिनेमा व्यवसायात जाण्याची आमच्या वडिलांनी तिच्यावर सक्ती केली नव्हती तसेच उत्तेजनही दिले नव्हते किंवा पोसण्याचेही नाकारले नव्हते ! हा तिने स्वखुषीने पत्करलेला मार्ग होता. हा व्यवसाय तिच्या स्वभा-वाला पोषक असाच होता व त्यामुळेच तिने तो पत्करला. ' नेणत्या जनतेचा बुद्धीभेद ' करून स्वतःची पोळी भाजून घेणारे तिला याबद्दल शाबासकी देत असतील पण माझ्या मते तिने आपले आयुष्य व्यर्थ घालविले असेच आहे. व पू. वडिलांच्याबद्दल धादांत खोटी विधाने करून ती पापाचीच धनीण झाली आहे. ज्या बापावर प्रेम नाही त्याच्या पुण्याईवर जगण्याची धडपड कशासाठी ?

you can fool all people for

some time; some people for all time; but you cannot fool all people for all time ! ' □

## दोन विचार

२१ नोव्हेंबर, ७२

□ मी 'माणूस'चा नियमित वाचक आहे. आपल्या साप्ताहिकातून आपण वरचेवर निरनिराळ्या विचारांना व समस्यांना चालना देत असता. माझ्या मनात काही दिवस घोळत असलेला एक विचार आज आपणापुढे मांडत आहे. आपल्या साप्ताहिकातून त्यावर Economics and Politics या दोनही दृष्टीकोनातून कोणीतरी अधिकारी व्यक्तीने लेख लिहावा असे वाटते.

विचार :– ज्यावेळी सामाजिक न्यायाचा विचार केला जातो त्यावेळी फार मोठा भर आर्थिक मोबदल्यावरच असतो. समाज धारणेला सर्वच तऱ्हेच्या कामांची जरुरी आहे आणि म्हणूनच कामात प्रतवारी नसावी (Dignity of lobour) असा एक विचार. प्रत्येक समाजातील घटकाला माणूस म्हणून किमान काही एका दर्जाचे जिणे जगता आले पाहिजे हा दुसरा विचार.

आता प्रत्यक्षात कामाची प्रतवारी केली जाते हे सत्य आहे. तेव्हा ती करताना मार्गदर्शक तत्वे काय असावीत ? मला वाटते की शैक्षणिक पात्रता (बुद्धी) व शारिरीक श्रम या दोहोंचा विचार व्हावा.

या दृष्टीने विचार करता प्रत्यक्षात काय दिसते ते पहाणे उद्‌बोधक होईल. यासाठी निरनिराळी कामे करून घेणाऱ्या एखाद्या प्रातिनिधिक संस्थेचे काम आपण पाहू. त्यासाठी सरकारी वा निमसरकारी (Corporation) व नोकर वर्गाकडेच दृष्टीक्षेप टाका. कारण आपले सरकार हे socialisation (समानता व सामाजिक न्याय) याला वद्धपरिकर आहे.

ही यादी पुष्कळ लांबवता येण्यासारखी आहे. त्यातून निघणारे निष्कर्ष पुष्कळच उदबोधक आहेत. सामाजिक विषमता फार भयानक आहे.

बऱ्याच वेळा सामाजिक न्यायाच्या आड तथाकथित पुंजीपतीच फक्त येतात अशी समजूत आहे. वरील यादीतून ज्यांच्याकडे फारच झुकते माप पडते तेही 'Establishment'मधील लोक सामाजिक न्यायाच्या विरोधकात असतील अशी खात्री वाटते. कारण खरा सामाजिक न्याय व समता स्थापायची तर यांच्या कामाच्या मोबदल्याला जोराची कात्री लावावी लागेल. (इतरांचे मोबदले त्यांच्याबरोबर आणून ठेवणे केवळ अशक्य आहे.)

असो, आपल्यापुढे विचाराचे सूत्र थोडक्यात ठेवले आहे. ते पुरेसे सुस्पष्ट झाले असावे अशी आशा आहे. आपणास


| नोकरीचे ठिकाण | शैक्षणिक पात्रता किमान | पात्रतेसाठी येणारा खर्च. | लागणारा वेळ | कामाचे स्वरुप बौद्धिक | शारिरीक | मोबदला रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| P. W. D. | B. E. | १५०००- | ६ वर्षे | उत्तम | कष्टाचे | ८००-१००० |
| Indian oil | ,, | २०००० | ,, | ,, | मध्यम | १५००-२००० |
| बस कंडक्टर | S. S. C. | -- | -- | मध्यम | पुष्कळ | ५०० |
| प्राथमिक शिक्षक | S. S. C., Dip Ed | २००० | १-१॥ | उत्तम | मध्यम | २००-३०० |
| कॉलेज लेक्चरर | M. A., M.sc.etc | १०००० | ६ | उत्तम | मध्यम | ६०० |
| बँकेतील कारकून | B. A. B. com | ८००० | ४ | मध्यम | मध्यम | ५०० |
| बँकेतील शिपाई | S. S. C. | -- | -- | साधारण | साधारण | ३०० |
| म्युनिसीपालिटीत Shop Inspector | B. A. | ८००० | -- | मध्यम | पुष्कळ | ५०० |
| वैमानिक | licence B | १००००-१५००० | २ | उत्तम | मध्यम | ३०००-४००० |
| बोटीवर कप्तान | कॅप्टनची परीक्षा | पैसे मिळवतशिकता येते | ६ | उत्तम | पुष्कळ | २५००-३००० |
| वैमानिक (सैन्यातील) | | | ४-५' | उत्तम | पुष्कळ | १०००-१२०० |
| पोलिस सब-इन्स्पेक्टर | S. S. C. | -- | ८-१० | मध्यम | कष्टाचे | ४००-५०० |

योग्य वाटेल ते आपण करालच.

ता. क. साधारण ७-८ वर्षे नोकरी केल्यानंतर मिळणारा मोबदलाच दर्शविला आहे. मासिक पगाराशिवाय मिळणारे इतर फायदे प्रवास भत्ता, सुटीत राहण्यासाठी हवेशीर जागी गाळे इ. यांचा समावेश येथे केलेला नाही.

डॉ. सि. एम्. पंडित, मुंबई.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर



MANOOS
(Weekly )

Regd. No.
MH–649